






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०१.०६.२०२६ | अंक नं. ०५२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020











# पावसाच्या पहिल्याच फटक्यात शहराचा वीजपुरवठा कोलमडला; आपत्ती व्यवस्थापनच आपत्तीग्रस्त, 'मेंटेनन्स'च्या दाव्यांचा फज्जा

### ५ मिनिटे पाऊस, ५ मिनिटे वादळ, ५ तास वीज गायब.. पालकमंत्री, लोकप्रतिनिधींनी याची दखल घ्यावी अन्यथा अधिकाऱ्यांना कॅबिनमध्ये कोंडून महावितरणला टाळे ठोकणार

नगर – अवघ्या पाच मिनिटांचा पाऊस आणि पाच मिनिटांचे वारे, पण वीज गायब मात्र तब्बल पाच तास! अस्मानी संकटापेक्षा महावितरणच्या सुलतानी कारभाराचाच फटका, अहिल्यानगरांना अधिक बसत असल्याचे काल रात्री पुन्हा एकदा अधोरेखित झाले. शहरात हलकासा पाऊस पडताच वीजपुरवठा खंडित होणे, ही आता नगरकरांसाठी नवी बाब राहिलेली नाही, मात्र या प्रकारामुळे शहराचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, नागरिकांमध्ये प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरवर्षी पावसाळा सुरु होण्यापूर्वी महावितरणकडून मेंटेनन्सच्या नावाखाली शनिवार-शनिवार वीजपुरवठा बंद ठेवून मोठ्या थाटात दुरुस्तीची कामे केली जातात. मात्र, हा नक्की कसला मेंटेनन्स आहे, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

पावसाळ्याच्या तोंडावरही शहरातील अनेक भागांत झाडे आणि वेलींमध्ये अडकलेल्या वीजवाहिन्या, एकमेकांवर घासणाऱ्या तारा आणि ठिकठिकाणी पडलेले जुने खांब महावितरणच्या 'आपत्ती व्यवस्थापनाचा' बुरखा फाडत आहेत. कालच्या पावसात रस्ते पाण्याखाली गेले, तर दुसरीकडे तासनतास गायब असलेल्या वीजेमुळे पाणी उपसा थांबला, रस्त्यावर अंधार पसरल्याने अपघातांची मालिका सुरु झाली आणि काही ठिकाणी चोऱ्यांचे प्रकारही समोर आले.

वीजपुरवठा नसल्यामुळे होणाऱ्या या साखळी समस्यांची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न विचारला जात आहे. शहरातील कॉंक्रीटच्या रस्त्यांचे काम असो किंवा ड्रेनेज व्यवस्था, ही कामे करताना नियोजनाचा अभाव पूर्णपणे दिसून येत आहे. रस्त्याच्या उताराच्या विरुद्ध दिशेला बांधलेली गटारे आणि तीन-चार इंच उंचीवर असलेले मॅनहोल पाहून नगरच्या विकासाचा हा 'उत्कृष्ट नमुना' जागतिक वस्तुसंग्रहालयात ठेवण्याजोगा आहे, अशी उपरोधिक चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे, अवघ्या पाच मिनिटांच्या पावसात तासनतास वीज घालवणारे नगर हे कदाचित भारतातील एकमेव शहर असावे. 'वीज पुरवठा सुरळीत का नाही?' असे विचारल्यावर महावितरणचे अधिकारी नेहमीप्रमाणे जुन्या तारा आणि खांबांचे रडगाणे गाऊन मोकळे होतात. मात्र, विकसित भारताची स्वप्ने पाहताना महावितरण आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या शहराला कायमस्वरुपी अंधारातच ठेवण्याचा जणू विडाच उचलला आहे. आता तरी पालकमंत्र्यांनी आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी या गंभीर बाबीची दखल घेऊन महावितरणच्या ढिम्म कारभाराला चाप लावला नाही, तर नगरकर रस्तावर उतरून अधिकाऱ्यांना त्यांच्याच केबिनमध्ये कोंडून महावितरणच्या कार्यालयाला टाळे ठोकल्याशिवाय शांत बसणार नाहीत, असा इशारा जागरूक नागरिक मंचातर्फे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी दिली आहे.



रविवारी रात्री शहरात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेल्या पावसामुळे काही ठिकाणी भिंत पडल्यामुळे रस्त्याच्या कडेला असलेल्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान (छायाचित्रे : समीर मन्यार)

# नगरमध्ये वादळामुळे भींत कोसळली, झाडे उन्मळून पडली; पोलही वाकले

नगर – ३१ मे रोजी रात्री शहरात झालेल्या भीषण वादळ आणि पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. एका घराची भींत कोसळली. काही ठिकाणी वीज वाहक तारा तुटल्या तर काही ठिकाणी महावितरणचे पोल वाकले. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीला अडथळे निर्माण झाले तर अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडीत झाला होता. या वादळी वाऱ्यांमुळे म हावितरणच्या विद्युत यंत्रणेचेही मोठे नुकसान झाले असून, महावितरणकडून दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले आहे.



चितळे रोडवरील नेता सुभाष चौक परिसरात वादळाने झाडाच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या होत्या. या फांद्या हटविताना महापालिकेचे कर्मचारी.

वादळाचा सर्वाधिक फटका सावेडी परिसराला बसला असून, येथे तब्बल ३० ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. शहराच्या इतर भागातही फांद्या तुटणे, घरांच्या आणि गेटवर झाडे पडणे अशा घटना घडल्या आहेत. याबाबत माहिती देताना महापालिकेचे उपअभियंता सुरेश इथापे म्हणाले की, वादळाने झाडे पडल्याची माहिती मिळताच महापालिकेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रस्ते मोकळे करण्याचे काम रात्रीपासून सुरू असून, घरांवरील झाडे हटवण्यात आली आहेत. वादळाने फाटलेले फ्लेक्सही मनपा कर्मचाऱ्यांकडून काढून टाकण्यात आले आहेत.

दरम्यान शहरातील बंगाल चौक परिसरातील एका घराची भिंत कोसळून रिक्षा, वाहनांवर दगड पडले होते. यामुळे वाहनांचे मोठे नुकसान झाले. या घटनेत कोणाला इजा झाली नसली तरी वाहनांच्या काचा तुटून नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. याबाबत महापालिकेच्या आपत्ती विभागाला कळविण्यात आले. मोठा कालावधी उलटला तरी कोणीही दाखल झाले नाही. त्यामुळे स्थानिकांनीच पुढाकार घेत तेथे पडलेला सर्व मलबा हटविल्याचे स्थानिकांनी सांगितले.

वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे, झाडांच्या फांद्या पडून वीज वाहक तारा तुटल्या आहेत. वादळामुळे सावेडी, माळीवाडा, गंजबाजार, सोलापूर रोड, यशवंत कॉलनी परिसर, केडगाव, भिंगार आणि दरेवाडी यांसारख्या विविध भागांत झाडे विद्युत तारांवर पडली. यामुळे अनेक ठिकाणी खांब वाकले, तर काही ठिकाणी खांब पूर्णपणे तुटल्याने वीज वाहिन्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी सांगितले की, वादळ थांबताच दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक ठिकाणचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. मात्र, गंजबाजार, माळीवाडा, भिंगार आणि दरेवाडी या भागांतील दुरुस्तीचे काम अद्याप बाकी असून, ती तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत. लवकरच ही दुरुस्ती पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# गंजबाजार परिसरात एअर पिस्टल, चाकू हातात घेवून दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी पकडले

नगर - शहरातील गंजबाजार भागात धारदार चाकू आणि एअर पिस्टल बाळगून सार्वजनिक शांततेचा भंग करत दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गंजबाजार परिसरात ३० मे रोजी रात्री पावणेअकरा वाजेच्या सुमारास एक तरुण हातात चाकू आणि एअर पिस्टल घेऊन फिरत होता. तो मोठ्याने ओरडून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. यामुळे नागरिक घाबरले होते. ही माहिती पोलिसांना मिळाल्या नंतर कोतवाली पोलिसांच्या पथकाने तात्काळ धाव घेत प्रतीक भीमराव गायकवाड (वय २३, रा. पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) याला शिताफीने पकडले. त्याच्याकडून शंभर रुपये किमतीचा १० इंच लांबीचा धारदार लोखंडी चाकू आणि तीन हजार रुपये किमतीचा एक लोखंडी एअर पिस्टल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पो.कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी आरोपी प्रतिक गायकवाड याच्या विरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ११०,११७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल

## विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप आमदारांची उपस्थिती

नगर - विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून राहुरीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून, तनपुरे यांनी १ जून रोजी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप आमदारांची उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा १ जून रोजी शेवटचा दिवस होता. त्यामुळे अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची धावपळ सुरु होती. सकाळी १२ वाजेच्या दरम्यान तनपुरे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी प्रा. शिंदे, मंत्री विखे पाटील यांच्यासह आ. अमोल खताळ, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठल लंघे, आ. अक्षय कर्डिले, महापालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना तनपुरे म्हणाले, मला विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी संधी दिली, त्याबद्दल मी भारतीय जनता पक्षातील सर्व नेत्यांचे आभार मानतो. आज


प्राजक्त तनपुरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रा. राम शिंदे, राधाकृष्ण विखे पाटील, अमोल खताळ, काशिनाथ दाते आदी.

माझ्यावर कोणी टीका करीत असतील तर ते माझे पूर्वीचे सहकारी होते. त्यामुळे मी कोणावरही टीका करणार नाही. त्यांनी काय बोलावे हे मी त्यांना सांगू शकत नाही. मला जनतेचा आग्रह होता, म्हणून मी भाजपात गेलो आहे. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनीही माझ्यावर जो विश्वास दाखविला, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो, असे तनपुरे यांनी सांगितले.

मंत्री विखे पाटील म्हणाले, प्राजक्त तनपुरे यांचा महायुतीचे उमेदवार म्हणून आज अधिकृतपणे अर्ज दाखल करण्यात आला आहे. महायुतीत कोणतीही नाराजी नाही. आ. संग्राम जगताप यांच्याकडून कोणतीही वेगळी भूमिका घेतली जाणार नाही. त्यांच्याशी माझे बोलणे झालेले आहे. त्यामुळे आम्ही महायुती म्हणून सर्वजण एकत्र आहोत.

संजय राऊत यांनी प्राजक्त तनपुरे यांच्याविषयी केलेल्या व्यक्तव्यावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले, खा. संजय राऊत यांच्या वक्तव्याकडे मी लक्ष देत नाही. त्यांच्या स्वतःच्या पक्षाला आज श्रद्धांजली वाहण्याची वेळ आली आहे. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या पक्षाची काळजी करावी.

लाडकी बहिणी योजनेविषयी ते म्हणाले, लाभार्थ्यांची केवायसी करण्याच्या सुचना सरकारने दिलेल्या आहेत. योजनेतून काही लाभार्थ्यांना वगळण्यात येणार आहे. सरकारचे जे निकष आहेत, ते पूर्ण करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

मराठा आरक्षणाविषयी बोलताना ते म्हणाले, कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे काही लोकांचे जे वक्तव्य येतात, त्यांची नेमकी भूमिका काय आहे, हे मला माहिती नाही. ते दुर्दैवी आहे, असेही मंत्री विखे पाटील म्हणाले.

# महाविकास आघाडीत जागा कोणाला, उमेदवार कोण, एबी फॉर्म कोणाला शेवटपर्यंत लागला नाही थांगपत्ता

## ससाणे यांनी दाखल केला अपक्ष अर्ज

नगर - विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी १ जून रोजी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असतानाही महाविकास आघाडीत जागा कोणाला, उमेदवार कोण, एबी फॉर्म कोणाला, याचा शेवटपर्यंत थांगपत्ता लागला नाही. वरिष्ठांकडून एबी फॉर्मही आले नाहीत आणि उमेदवारी दाखल करण्यासाठी अधिकृत आदेशही आला नाही. त्यामुळे करण ससाणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीतील संदिग्ध गोंधळामुळे अहिल्यानगरला महाविकास आघाडीचा उमेदवार देता आला नाही.

दरम्यान करण ससाणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांनाच महाविकास आघाडीकडून पुरस्कृत करण्यात येईल, असे सुत्रांनी सांगितले. याबाबत पक्षाचे निरीक्षक बाळासाहेब थोरात, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

रविवारी पक्षाचे निरीक्षक बाळासाहेब थोरात यांनी कॉँग्रेसकडून करण ससाणे आणि दीप चव्हाण यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी तयारी करण्याचे निर्देश दिले होते. संगमनेर येथील बैठकीत दोघांचा सत्कारही करण्यात आला. मात्र, १ जून रोजी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत पक्षाचे एबी फॉर्म पोहोचलेच नाही. तर दुसरीकडे खा. निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी करण्याचे आदेश पक्षाकडून आले आहेत, असे सांगत त्या उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले. त्यांनी अर्जही घेतला होता. मात्र, शेवटपर्यंत त्यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे महाविकास आघाडीकडून एकही उमदेवारी अर्ज शेवटपर्यंत दाखल होऊ शकला नाही.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजे १ जूनपर्यंत एकूण ५ उमेदवारांनी ८ अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये भाजपकडून प्राजक्त तनपुरे, अपक्ष करण ससाणे, कमलेश गांधी, मच्छिंद्र धुमाळ, दत्तात्रय पानसरे यांचा समावेश आहे. २५ मे ते १ जूनपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून, ४ जूनपर्यंत अर्ज माघारीसाठी मुदत देण्यात आली आहे. १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, २२ जून रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होणार आहे.

# ... तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक विधानपरिषद निवडणुकीच्या मतदानाबाबत वेगळा विचार करतील?


गणेश भोसले

नगर - अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. अहिल्यानगरची जागा भाजपने स्वतःकडे घेतली असल्याने महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराजी दिसून येत आहे. दिवंगत आ. अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर या जागवेर त्यांच्याच घरातील उमेदवार असायला हवा होता. मात्र, ही जागा भाजपने स्वतःकडे घेवून राष्ट्रवादीला बेदखल केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतील नगरसेवकांमध्ये नाराजी असून, मतदानाच्यावेळी ते वेगळा विचारु करु शकतील, असा इशारा माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी दिला आहे.

भोसले यांनी म्हटले आहे, माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप हे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत दोनदा निवडून आले होते. जगताप कुटुंबियांचे सर्वांबरोबर चांगले संबंध असून त्यांच्या कुटुंबीयांचा या जागेवर पहिला हक्क आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे घेऊन आयुर्वेद शिक्षण मंडळाचे

## पक्षाची अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटासारखी होईल

अध्यक्ष सचिन जगताप यांना उमेदवारी देण्यात यावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक या निवडणुकीत मतदानासंदर्भात वेगळा विचार करतील. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आपल्या मुलाच्या उमेदवारीसाठी झटत आहे पक्षातील नेते आपल्या मतदारसंघा पुरतेच मर्यादित राहिले तर पक्षाची अवस्था राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटासारखी होईल, असा इशाराही भोसले यांनी दिला आहे.

गणेश भोसले पुढे म्हणाले की, स्वर्गीय अरुणकाका जगताप हे दोन वेळा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यांनी जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मजबूत संघटना उभी केली. त्यामुळे या निवडणुकीत त्यांच्या कुटुंबीयांचा नैतिक आणि राजकीय हक्क सर्वप्रथम विचारात घेतला गेला पाहिजे. सचिन जगताप यांना उमेदवारी देऊन त्यांच्या कुटुंबाच्या योगदानाचा सन्मान करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

भोसले पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पाळेमुळे रुजविण्याचे आणि त्याचा वटवृक्ष करण्याचे मोठे काम आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे. तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रियता असलेले, संघर्षशील आणि तडफदार नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वर्गीय अजितदादा पवार यांचाही त्यांना मंत्री करण्यासाठी प्रबळ आग्रह होता. मात्र, एका मामाच्या हट्टापायी शेवटच्या टप्प्यात त्यांना डावलण्यात आले आणि कारखानदारीला प्राधान्य देण्याचा निर्णय शरद पवार गटातील नेतृत्वाने घेतला. जनाधार, संघर्ष आणि कार्यकर्त्यांची ताकद एका बाजूला ठेवून वारसाहक्काच्या राजकारणाला महत्त्व देण्यात आले. कार्यकर्त्यांच्या भावना आणि जनतेचा कौल दुर्लक्षित करून एका भाच्याला पुढे केले गेले. आज तोच भाचा सत्तेच्या लोभासाठी भाजपमध्ये जात असल्याचे चित्र दिसत आहे. ज्यांच्या आशीर्वादाने राजकीय उंची मिळाली, त्यांच्याच राजकीय भूमिकेला छेद देण्याचे काम सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली.

राजकारणात जे पेरले जाते तेच उगवते. निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करून घेतलेल्या निर्णयांचे परिणाम आज सर्वांसमोर आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत योग्य न्याय झाला पाहिजे, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# दोन महागड्या मोबाईलची चोरी

नगर - शहरातील नवनागापूर परिसरामध्ये असलेल्या दूध डेअरी चौक, दत्तमंदिर भागात घरफोडीची एक घटना समोर आली आहे. राहत्या घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्याने दोन महागडे मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना ३० मे रोजी रात्री १० ते ३१ मे रोजी पहाटे ५.३० या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत घनशाम नवनाथ मुंढे (वय २१, रा. पश्चिगरी, ता. पाटोदा, जि. बीड, सध्या रा. दूध डेअरी चौक, नवनागापूर, अहिल्यानगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा आपल्या मित्रासोबत या भागात राहतो. रात्रीच्या वेळी सर्वजण झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरात ठेवलेला फिर्यादीचा ३० हजार रुपये किमतीचा आणि त्याच्या मित्राचा २० हजार रुपये किमतीचा असे एकूण ५० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन चोरून नेले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर घनशाम मुंढे याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## स्टेट बँकेतूनही मोबाईलची चोरी

मोबाईल चोरीची आणखी एक घटना शहरातील स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत घडली आहे. शेवगाव येथील शेतकरी सुधीर पोपटराव जिरेसाळ (वय ६६) हे कामानिमित्त स्टेट बँकेत गेले होते. तेथे अज्ञात चोरट्याने त्यांचा वन प्लस कंपनीचा मोबाईल चोरून नेला. कॅचोरीची घटना निदर्शनास येताच जिरेसाळ यांनी भिंगार वरम्प पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर - नगर कल्याण महामार्गावर पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरात साईनगरी हॉटेलजवळ ३१ मे रोजी पहाटे १.३० च्या सुमारास भरधाव वेगातील अज्ञात वाहनाच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. संदीपकुमार गोविंद धुमाळ (वय ४२, रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) असे मयताचे नाव आहे.

याबाबत मयताचे भाऊ संजय कुमार गोविंद धुमाळ (वय ४७, रा. टाकळी ढोकेश्वर, हल्ली रा. पाईपलाईनरोड, अहिल्यानगर) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मयत संदीपकुमार धुमाळ हे ३१ मे रोजी पहाटे १.३० च्या सुमारास स्वतःची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. एमएच-१२ एसएस-८५८४) घेऊन जात होते. याच दरम्यान, समोरून भरधाव वेगात येणाऱ्या एका अज्ञात वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हलगर्जीपणे चालवून संदीपकुमार यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. या भीषण अपघातात संदीपकुमार गंभीर जखमी झाले आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, अपघात घडवून आणल्यानंतर संबंधित अज्ञात वाहन चालक कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(ए)(बी), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांन्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# श्रीमती राधाबाई दुडगू यांचे दु:खद निधन



नगर - येथील रहिवासी श्रीमती राधाबाई रमेश दुडगू (वय ६१, रा.तोफखाना, नवरंग व्यायाम शाळेजवळ) यांचे ३० मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कोमल आडेप, अश्विनी मंची यांच्या त्या मातोश्री होत.

# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा टंचाई निवारणासाठी जिल्ह्यात यंत्रणा सज्ज ठेवा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर - एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जलस्रोतांचे नियोजन, चाऱ्याची उपलब्धता तसेच संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी आतापासूनच सज्ज राहून प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात एल-निनोचा प्रभाव आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी अनुपकुमार यादव, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधीक्षक अभियंता सुनंदा नरवाडे, नगरपालिका प्रशासन अधिकारी अभिजित हराळे, नायब तहसीलदार भारती घोरपडे उपस्थित होते. तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन

एल-निनो प्रभाव व उपाययोजनांबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठक



करण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना राबवून नागरिकांना दिलासा देण्यावर भर द्यावा. ग्रामीण व शहरी भागातील पाणीपुरवठा योजनांची नियमित तपासणी करून त्या सतत कार्यान्वित राहतील, याची दक्षता घ्यावी.

जिल्ह्यातील उपलब्ध पाणीस्रोतांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांवर शीघ्रगतीने कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले विशेष पथक स्थापन करून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध राहणे आवश्यक आहे. यासाठी गाव, मंडळ आणि तालुकास्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. ज्या भागात चाऱ्याची उपलब्धता अधिक आहे, तेथून चारा टंचाई असलेल्या तालुक्यांमध्ये चाऱ्याचा पुरवठा करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. प्रत्येक तालुक्यात नियमितपणे पाण्याचे नमुने तपासण्यात यावेत. पाण्याच्या गुणवत्तेवर सातत्याने लक्ष ठेवून नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्यात यावे. पाणी वितरणात पारदर्शकता आणि कार्यक्षमता राखून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जलसंपदा विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महावितरण, नगरपरिषद प्रशासन तसेच इतर संबंधित विभागांकडून सद्यस्थितीचा आढावा सादर करण्यात आला. संभाव्य परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, भूजल पातळी, जलस्रोतांची स्थिती, चारा उपलब्धता तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.


यशवंत कॉलनीत झाड विजेच्या तारावर पडल्याने रस्ता पूर्णपणे बंद झाला तर वसंत टेकडी येथील विनय पाऊलबुधे यांच्या बंगल्यावर झाडे कोसळल्याने शेडचे नुकसान झाले. (छाया - विजय मते)

# सावेडी उपनगरात वादळी वाऱ्याने वृक्ष पडली, तारा तुटल्या, वीज गायब, घरांचे नुकसान

नगर - रविवारी रात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड पाईपलाईन रोड परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यासह तासभर झालेल्या पावसाने सर्वत्र पाणी पाणी झाले. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या वाऱ्याचा वेग इतका होता की मुळासह मोठमोठे वृक्ष कोसळली. घरांवरील पत्रे उडून गेले. अंगणात असलेली झाडे घरावरच पडल्याने अनेकांचे नुकसान झाले. वसंत टेकडी येथील विनय पाऊलबुधे यांच्या घराजवळीत मोठमोठे वृक्ष मुळासह उन्मळून पडली यामध्ये शेडचे मोठे नुकसान झाले. नगर छत्रपती - संभाजीनगर रोडवरील विजेचे तारा तुटल्याने काही ठिकाणी खांब वाकले. सकाळपासून महानगरपालिका व वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर तारा जोडणे, झाडे बाजूला काढण्याचे काम सुरू केले.

रात्रीच्या वादळी वाऱ्यामुळे रात्रभर वीजपुरवठा खंडित झाल्याने अनेकांना त्रास सहन करावा लागला. फकीरवाडा गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड वरील कॉलनीतील झाडे रस्त्यात पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती.

# अहिल्यानगर जिल्ह्यात ३ जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'येलो अलर्ट'

नगर - भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात ३१ मे ते ३ जून या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# गृहिणी

## आरोग्य

### थंड पाणी पिताय सावधान...

उन्हाळ्यात बाहेरून आल्या आल्या फ्रिजमधले गार पाणी पिण्याची सवय आपल्याला तात्पुरता थंडावा देते, पण शरीराच्या आत मात्र त्याचे वेगळेच परिणाम होतात. अतिथंड पाण्या मुळे पचनक्रिया थेट मंदावते कारण जठरातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि अन्न पचवायला त्रास होऊन गॅस-सिडिटी वाढते. घशाची नाजूक त्वचा अचानक थंड पाण्याच्या संपर्कात आल्याने घसादुखी, टॉन्सिल्सची सूज आणि वारंवार सर्दी-खोकला बळावतो. शरीराचं तापमान एकदम बदलल्याने वेगस नर्व्ह उत्तेजित होते आणि हृदयाचे ठोके अचानक कमी होऊ शकतात, जे लो बीपी असणाऱ्यांना त्रासदायक ठरतं. थंड पाणी प्यायल्यावर डोक्यात 'ब्रेन फ्रीझ' सारखी तीव्र कळ येऊ शकते कारण मेंदूकडच्या रक्तवाहिन्या झटकन आकुंचन पावतात. जेवणानंतर लगेच थंड पाणी घेतल्याने अन्नातील स्निग्ध पदार्थ घट्ट होतात, त्यामुळे चरबी वाढण्याची आणि वजन वाढण्याची शक्यता असते. सतत थंड पाणी पिण्याने शरीरात कफ वाढतो, श्वसनमार्गात श्लेष्मा साचतो आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊन इन्फेक्शन लवकर होते. तसेच आतड्यांची हालचाल संथ झाल्याने बद्धकोष्ठतेचा त्रासही सुरू होतो. म्हणून उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी माठातील पाणी, कोमट पाणी किंवा नारळपाणी, ताक यांसारखे नैसर्गिक पर्याय निवडणे केव्हाही चांगले.

## पाककला

### नारळ लिची लाडू

**साहित्य** : ताजा खोवलेला नारळ २ वाट्या, लिचीचा गर १ वाटी, बारीक चिरलेला कंडेन्स्ड मिल्क १ वाटी, तूप २ चमचे, वेलची पूड १ चमचा, सुक्या मेव्याचे काप २ चमचे आवडीनुसार वरून लावायला, थोडा सुक्या नारळाचा चुरा

**कृती** : एका जाड बुडाच्या कढईत १ चमचा तूप गरम करा. त्यात खोवलेला नारळ घालून मंद आचेवर ४-५ मिनिटे परतून घ्या. नारळाचा कच्चेपणा जाईल पण रंग बदलू देऊ नका. आता त्यात बारीक चिरलेला लिचीचा गर घाला. लिचीमध्ये पाणी असतं, त्यामुळे मिश्रण थोडं पातळ होईल. मंद आचेवर लिचीचं पाणी आटेपर्यंत सतत परता. साधारण ६-७ मिनिटे लागतील.पाणी आटलं की त्यात कंडेन्स्ड मिल्क घाला. मिश्रण एकजीव होईपर्यंत परता. गोळा कढईपासून सुटू लागला की समजा मिश्रण तयार आहे. शेवटी वेलची पूड, सुक्या मेव्याचे काप आणि १ चमचा तूप घालून मिक्स करा. गॅस बंद करा. मिश्रण कोमट झाल्यावर हाताला थोडं तूप लावून त्याचे मध्यम आकाराचे लाडू वळा. तयार लाडू सुक्या नारळाच्या चुऱ्यात घोळवून सर्व्ह करा.

## वास्तू

### जेवणाचे टेबल

* डायनिंग टेबल पश्चिम किंवा वायव्य दिशेला ठेवा.
* वायव्य दिशा वायू तत्वाची असते, त्यामुळे पचन चांगले होते.
* ईशान्य कोपऱ्यात किंवा मुख्य दरवाज्यासमोर टेबल ठेवू नका. जेवणाच्या टेबलावर औषधे, पाकीट ठेवू नका.

## सौंदर्य

डाळिंबाचे दाणे वाटून त्यात थोडी दूधाची साय मिसळा. ही पेस्ट १० मिनिटे ओठांवर लावा. ओठ गुलाबी होतात.

## सल्ला

टोमॅटोला खालून + चा काप द्या. ३० सेकंद गरम पाण्यात टाका, मग थंड पाण्यात टाकावे साल एका झटक्यात निघेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, मूळ २२।०६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आज भावना दुखावतील, घर-जमीन व्यवहार टाळा. आईच्या तब्येतीची काळजी घ्या, स्त्रीमुळे त्रास संभवतो.

**वृषभ** : अती हळवे व्हाल पण आर्थिक नियोजन यशस्वी होईल. बँकिंग नोकरीसाठी शुभ दिवस.

**मिथुन** : सुरवातीला त्रास पण नंतर कामे पूर्ण होतील. मित्रांच्या सहवासाने आनंद मिळेल.

**कर्क** : कुटुंब-मित्रांसोबत दिवस छान, भेटवस्तू व लाभ मिळतील. पत्नीचा सहवास लाभेल, जवळचा प्रवास होईल.

**सिंह** : कोर्ट कचेरीपासून दूर रहा, वाद टाळा. मन बेचैन राहील, घरासाठी खरेदी कराल.

**कन्या** : यश, कीर्ती, आर्थिक लाभ मिळेल. पत्नी-मुलांसोबत वेळ चांगला, वैवाहिक सुख लाभेल.

**तूळ** : घर-ऑफिसचे वातावरण चांगले, बढतीची शक्यता. सरकारी कामात यश, पैसे येतील.

**वृश्चिक** : थकवा-आळस जाणवेल, महत्त्वाची कामे पुढे ढकला बॉस नाखूष होतील, एकांतात विचार करा.


**धनु** : खाण्या-पिण्यावर लक्ष द्या, काम उशिरा होईल. नवे काम नको, खर्च वाढेल, नवीन मित्र बनतील.

**मकर** : चंद्र मकर राशीत, पद-पैसा वृद्धी योग आहे. लाभ होईल, भूतकाळात अडकू नका.

**कुंभ** : भावनात्मक चढ-उतार राहतील. सकाळी भावनिक व्हाल, दिवसभर संयम ठेवा.


**मीन** : आयटी-बँकिंगसाठी शुभ, रखडलेली कामे पूर्ण होतील. घरात वाद होऊ शकतो, बोलणे सांभाळा. गैरसमज टाळा.

## शब्दगंध क्र. ७४४२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) मागे घडलेल्या घटनांचा वृत्तांत; हिस्ट्री ४) उजाड; वैराण; ओकेबोके ५) चोप; ताडन ६) मागे पाऊल; मागे सरणे ८) अमाउंट; बाब; कलम; विशिष्ट द्रव्यसंख्या १०) कवितेत तुझे १२) एक प्रकारचे पसरट भांडे १३) तपश्चर्या; व्रत; ईश्वरभजन वगैरे १६) वाकलेला; झुकलेला १७) भारताचे एक माजी पंतप्रधान २०) एक पक्षी; वायस; काक; काग २१) उसाचा रस काढण्याचे चक्र २३) रक्तवाहिनी; धमनी; शीर; नाडी २४) विविध शोध लावणारे ज्ञान; सायन्स

शब्दगंध क्र. ७४४१ चे उत्तर



**उभे शब्द** :- १) बिल्डिंग; भवन; वास्तू २) थोडेसे तिरपे ३) पूर्ण भरतीची वेळ ४) विश्वास; खात्री ७) समान संख्यांचा गुणाकार; विध्वंस ९) मराठे लोकांच्या चालीरीती ११) पडदा; कापडी भिंत १४) घोंगडी तयार करणारा एक समाज; मेंढपाळ १५) धर्मार्थ देणे १७) घर; निवासस्थान; गृह १८) काम यशस्वी होण्यासाठी देवाला लावलेला कौल १९) शिंपडणे; सडा; शेतीला पाणी देण्याची क्रिया २२) ऐकण्याचे इंद्रिय; महाभारत कथेतील अंगदेशचा राजा; कान

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : संघर्ष हा यशाचा पाया असतो, जो आज झुकत नाही तोच उद्या जग जिंकतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विजेचा रंग कसा असतो?

विजेचा रंग एकसारखा पांढरा नसतो तर हवेतील घटक, तापमान आणि धूळ यांवर तो बदलतो. बहुतेक वेळा आपण पाहतो ती वीज निळसर-पांढरी किंवा जांभळट असते कारण विजेचा प्रवास मुख्यतः हवेतील नायट्रोजन वायूमधून होतो. जेव्हा विजेच्या झोताचे तापमान ३०,००० डिग्री सेल्सिअसपर्यंत जाते तेव्हा नायट्रोजनचे रेणू उत्तेजित होऊन निळा आणि जांभळा प्रकाश उत्सर्जित करतात.

जर हवेत ऑक्सिजनचे प्रमाण जास्त असेल आणि वीज जमिनीच्या जवळ चमकत असेल तर ती लालसर किंवा केशरी दिसू शकते.पावसाळ्यात हवेत आर्द्रता आणि धुळीचे कण जास्त असतात, त्यावेळी विजेचा प्रकाश पिवळसर किंवा सोनेरी दिसतो कारण धूळ प्रकाशाचे प्रकीर्णन करते. कधी कधी ढगांमध्ये बर्फाचे स्फटिक असतील तर वीज हिरवट रंगाची दिसते, हा प्रकार गारपीट होण्याआधी दिसून येतो.विजेचा रंग तिच्या तपमानावरही अवलंबून असतो, जास्त तापमानाची वीज निळी-पांढरी तर कमी तापमानाची वीज लालसर दिसते.उंचावर, विरळ हवेत चमकणारी वीज जास्त निळी दिसते कारण तिथे नायट्रोजनचे आयनीकरण जास्त होते. विजेच्या जवळची हवा तापून प्लाझ्मा तयार होतो, तो प्लाझ्मा पांढरा प्रकाश देतो म्हणून दूरवरून वीज पांढरी शुभ्र दिसते.

शहरांमध्ये प्रदूषण जास्त असेल तर धूर आणि धूलिकणांमुळे वीज जांभळी किंवा गुलाबी दिसू शकते. वाळवंटी भागात वाळूच्या कणांमुळे वीज केशरी किंवा तपकिरी रंगाची दिसल्याची नोंद आहे. ज्वालामुखीचा उद्रेक होताना जी वीज चमकते ती राख आणि सल्फरमुळे अनेकदा लाल किंवा जांभळी असते. कॅमेऱ्यात टिपलेली वीज नेहमी पांढरी दिसते कारण कॅमेरा सेन्सर खूप प्रकाश एकत्र घेतो, पण डोळ्यांनी प्रत्यक्षात वेगवेगळे रंग दिसू शकतात. ढग ते ढग यांच्यातील वीज आणि ढग ते जमीन यांच्यातील विजेच्या रंगातही फरक असतो.

जमिनीवर आदळणारी वीज जमिनीतल्या खनिजांमुळे क्षणभर हिरवी किंवा निळी चमक दाखवू शकते. लाल स्प्राइट आणि निळे जेट हे विजेचेच प्रकार वरच्या वातावरणात दिसतात, त्यांचा रंग वायूंच्या थरांमुळे ठरतो. थोडक्यात, विजेला स्वतःचा एक ठराविक रंग नाही, ती ज्या माध्यमातून प्रवास करते त्याचा रंग ती घेते.

आपण पाहतो तो रंग म्हणजे विजेच्या मार्गात येणाऱ्या हवेतील वायूंचा आणि कणांचा उत्सर्जित प्रकाश असतो. म्हणून पुढच्या वेळी वीज चमकली की तिचा रंग नीट बघा, तुम्हाला हवेतील त्या वेळची स्थिती समजेल.

## जीवन का अमृत (भाग १)



यह मुश्किल लग सकता है पर यह एक व्यावहारिक संभावना हैं और सत्गुरु की दया से हर एक की पहुँच के अंदर है।

हर एक वस्तु जो पवित्र प्यारी और अच्छी हो, मुश्किल से प्राप्त होती है, पर उसका नतीजा बहुत ही शानदार होता है।

१. ऋद्धियाँ-सिद्धियाँ प्राप्त होना हमारा लक्ष्य नहीं। किसी भी वस्तु पाने में समय अवश्य लगता है ।

सामान्य २२७ -

८३. सत्संग सभाओं में नियमित रूप से जाना बहुत लाभदायक और सहायक होता है। यह मन को रूहानियत के रास्ते पर लगाए रखता है। अवांछनीय समाज से दूर रहना भी एक जरूरी बात है और यह सब शुरूआत में बहुत ही महत्वपूर्ण है। एक नन्हें पौधे को पानी और खुराक की जरूरत होती है, इससे पौधे का विकास होता है, जब तक कि यह एक बड़ा पेड़ नहीं बन जाता, जिसे बलवान हाथी भी नहीं हिला सकता। आपको बर्हिर्मुखी इंद्रियों को अंतर्मुख करना है और मन को स्थिर । इनका समाधान आपको पहले ही दे दिया गया है। सोचिए, आपको प्रभु की कितनी बड़ी नियामत मिली है। आप संसार में रहते हुए इसे बढ़ा सकते हैं।

### रुहानियत

बहादुर बनो। आप भाग नहीं सकते। भागना तो डरपोकों का काम है। पर एक जरूरी बात का ध्यान रखिए।

सत्गुरु को पूरी तरह समर्पित होने की कोशिश करो और उसकी दया और छत्रछाया में, आप भवसागर से सही-सलामत पार हो जाओगे। स्नेही पिता, (सत्गुरु) अपनी मजबूत बाजुओं में, आपकी एक छोटे बच्चे की तरह रक्षा करेगा और आपको जीवन की अग्नियों से, बिना जले हुए, सही-सलामत बाहर निकाल लाएगा। हर कोई गलती करता है।

इन गलतियों के द्वारा ही आपको एक शुद्ध और नूरी इंसान के रूप में बड़ा होना है। अपनी कमियों को एक-एक करके निकालते जाओ। आत्म निरीक्षण डायरी जरूरी है और इस उद्देश्य के लिए इसका प्रयोग अवश्य करना चाहिए।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : कारण मी स्वतःचा आदर करत असेन.

शिवानीदीदी : हो. आपल्याला असं वाटतं की लोकांनी आपल्यावर प्रेम केलं तर आपण स्वतःवर प्रेम करू शकतो. नाही, आधी आपल्याला हे प्रेम निर्माण करावं लागेल आणि स्वतःला द्यावं लागेल. आपल्या आत्म्याची शक्ती वाचवण्यासाठी आपल्याला दोष देणं आणि तक्रार करायचं बंद करणं, अशा छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष द्यावं लागेल.

सुरेश ओबेरॉय : ह्या माझ्यासाठी छोट्या गोष्टी नाहीत.

शिवानीदीदी आपण राग आणि दुःख निर्माण करत असू, तरी किमान त्यासाठी : इतरांना जबाबदार न ठरवता ते निर्माण करण्याची जबाबदारी आपण घेऊ शकतो.

सुरेश ओबेरॉय : बरोबर. असं केल्याने आपण अखंड बडबड करण्यापासून इतरांविषयी नकारात्मक विचार करण्यापासून वाचू शकतो.

### ऊर्जेची बचत

शिवानीदीदी : अगदी बरोबर. अशा प्रकारे आपल्या ऊर्जेची बचत होईल. समजा, तुम्ही एखाद्यावर चिडलात. तर जोवर तुम्ही रागात आहात, तुमची बॅटरी चार्ज होणार नाही. पण त्यानंतर हा राग मी निर्माण केला असा विचार केला तर तुमची ऊर्जा घटणार नाही, तिचा क्षय होणार नाही.

सुरेश ओबेरॉय : पण याचा उलटा परिणामही होऊ शकतो. मी स्वतःला अपराधी समजून, निराश होऊन स्वतःला शिक्षा करू शकतो.

शिवानीदीदी : याचसाठी आपण स्व-टीकेवर चर्चा केली. आपण जेव्हा ही जबाबदारी घेतो तेव्हा ऊर्जेचा -हास, क्षय होणं तिथेच थांबतं. नाही तर आपण पुढचे अनेक दिवस नकारात्मक विचार करत राहतो.

सुरेश ओबेरॉय : एकदा मी कोणालातरी राग सोडून द्यायला सांगितलं. कारण प्रसंग निवळला होता. तो म्हणाला की त्याच्या कुटुंबाला सूड आणि बदला घ्यायचा आहे.

शिवानीदीदी : इतरांना सुधारण्याच्या नादात आपण स्वतःचे वैरी बनतो आणि हाच कडवटपणा आपल्या मनात घर करतो. आपण दुसऱ्यांना दोष देत राहिलो तर तो फक्त आपल्याच विचारांत राहणार नाही तर आपण तो आजूबाजूला पसरवूदेखील.

सुरेश ओबेरॉय : मग आपण आपलं म्हणणं ऐकणाऱ्यांना आणि आपल्या मतांना समर्थन देणाऱ्यांना शोध.

शिवानीदीदी त्यामुळे फक्त रागावलेलं असतानाच नाही, तर त्यानंतरही आपली बॅटरी डाउन असेल. म्हणूनच आपल्या मानसिक अवस्थेसाठी आपण इतरांना तर जबाबदार ठरवत नाही हे ना याची खात्री करायला हवी.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : बाबा, यशाचं रहस्य काय? वडील : योग्य निर्णय.
मुलगा : आणि योग्य निर्णय कसे घ्यायचे?
वडील : चुकीच्या निर्णयांच्या अनुभवातून!

शिक्षक : पिंट्या, सांग बरं ५ + ५ किती?
पिंट्या : सर, हाताचे की पायाचे?
शिक्षक : डोक्याचे! पिंट्या : मग १ च सर, कारण डोकं एकच असतं.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतीय संविधानातील कोणते कलम 'जीविताचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क' देते? - कलम २१
* सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह कोणता? - गुरू

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कोबी

कोबीमध्ये तंतुमय पदार्थ (फायबर) बरेच असल्याने आतड्यांना उत्तेजना मिळून ती स्वच्छ होतात. मल पुढे सरकून शौचास साफ होते. म्हणून बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी कोबी किसून त्यावर थोडे मीठ, काळी मिरी व लिंबू पिळून खाल्ल्यास पचन व्यवस्थित होऊन पोट साफ होते. ७) त्वचेवर जखमा, पुरळ, इसब, ॲलर्जी झाली असेल, तर कोबी बारीक वाटून लावल्यास हे आजार लवकर आटोक्यात येतात.

८) त्वचा भाजून जखम झाली असल्यास कोबीच्या गड्डयांची बाहेरील मोठी पाने गरम पाण्याने स्वच्छ धुऊन त्वचेवर मऊ कापडाने बांधावीत. यामुळे जखम लवकर भरून येण्यास मदत होते.

९) सर्दी झाली असेल, तर कच्चा कोबी किसून तो उकळत्या पाण्यात टाकून त्याची वाफ घ्यावी. यामुळे सर्दीचा त्रास दूर होतो. रक्त किंवा आमवाताने सांध्यांना सूज आली असेल, तर त्या ठिकाणी कोबीची पाने गरम करून बांधावीत. यामुळे दुखणाऱ्या सांध्याला आराम मिळतो.

१०) कोबीरस व गाजररस एकत्र करून चिमूटभर हिंग घालून सेवन केल्यास डोळ्यांच्या तक्रारी दूर होतात.

११) कोबी स्त्रियांच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. गर्भाशय सुदृढ राहण्यासाठी नियमितपणे कोबीचे सेवन करावे. जर कोबीची भाजी आवडत नसेल, तर भोजनानंतर कोबीचा अर्धा ग्लासभर रस थोडेसे लिंबू पिळून घ्यावा. यामुळे खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होऊन आरोग्य सुधारते.

१२) कोबी कापून वाफवून त्याची रस्साभाजी करावी किंवा पाणी न घालता सुकी भाजी करावी, तसेच भाजीव्यतिरिक्त कच्चा कोबी नियमितपणे सॅलड म्हणून खावा. आहारात नियमितपणे कोबीचा वापर करण्यासाठी त्याचे थालीपीठ, पराठा, कोबी, वडे, भजी, लोणचे अशा विविध प्रकारे तो वापरावा.

१३) कोबीचे सूप रोज रात्री प्यायल्यास त्वचा कांतिमय होऊन बांधा सुडौल राहतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००


वेळ वाचवा, पैसे वाचवा

चष्म्याकरीता डोळे तपासण्यासाठी तासन तास बसून राहण्याची व २००-५०० रुपये खर्च करण्याची गरज नसते.

क्वॉलिफाईड ऑप्टोमेट्रीस्ट कडून कॉम्प्युटरद्वारे मोफत डोळे तपासणी

अल्प किंमतीत, उच्च दर्जाचे चष्मे, पैशांचा पुरेपूर मोबदला..



आडकर चष्म्यांचे तज्ज्ञ

पत्ता : कापड बाजार कॉर्नर, विजय सायकल्स् शेजारी, अहिल्यानगर, फोन : 9561344374

Eye Q Media

# निर्णयक्षमता गमावलेल्या युवकांना भागवत ग्रंथ आधार वाटतो

**ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांचे प्रतिपादन**

नगर – आजच्या निर्णयक्षमता गमावलेल्या युवकांना भागवत ग्रंथ आधार वाटतो, असा विश्वास ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी व्यक्त केला.

येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ते बोलत होते. इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक श्रीमान गिरीवरधारी दास यांनी अहिल्यानगर शहरासह देशभर सुरू असलेल्या इस्कॉनच्या आंतरराष्ट्रीय कार्याची माहिती दिली. सर्वश्री वैष्णवतोष्णी दास, डॉ.सतीश फाटके, अशोक कानडे, मदन कांबळे, डॉ.सौ.अंजली फाटके, मगनभाई पटेल, राजूभाई पटेल, मदन थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा पुष्पवृष्टी करत साजरा करण्यात आला. शहरातील विविध भागातील स्त्री-पुरूष भाविक उपस्थित होते.



माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास.

श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, १८ पुराण श्रवण केल्याचे पुण्य एकट्या भागवत कथेच्या श्रवणाने मिळते. कलीयुग दोषांचा सागर आहे. मद्यपान, पशुहत्या-मांसाहार, व्यभिचार, जुगार येथेच कली रहातो. भांडणे आणि दांभिकता ही कलीची लक्षणे आहेत.

नित्य-निरंतर कथा वाचन, कथा श्रवण, पूजा, जप करणाऱ्यांवर कलीयुगाचा प्रभाव पडत नाही. भगवंताचे नाम आणि भगवंत यामध्ये काहीही अंतर नाही. नाम घेताना भगवंताच्या उपस्थितीची अनुभूती येते. भगवंताचे नाम, भगवंताच्या लिला, भगवंताचे अवतार आपल्याला भगवंताकडेच नेतात.

आपण केलेल्या धर्मकार्याचा लाभ आपल्याला होतोच पण पुढील पिढ्यांनाही होतो. मुलगा भक्त झाला तर २१ पिढ्यांचा उद्धार करतो पण मुलगी भक्त झाली तर ती ४२ पिढ्यांचा उद्धार करते, असे तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. मुलगी साक्षात लक्ष्मी असते. जो भक्तीपूर्वक भागवत कथेचे अमृतपान करतो त्याला मृत्यूचे भय रहात नाही. जे आई-वडिल आपल्या मुला-मुलींना भगवंताची भक्ती करावी, हे सांगत नाहीत ते आई-वडिल म्हणण्या लायक नसतात. आज लेकरांना कार्टून दाखवा. ती पुढे कार्टूनच होतील.

भागवत कथा भवरोगावरची प्रभावी औषधी आहे. पशुहत्या-आत्महत्या करणारांना भागवत कथेत रूची रहाणार नाही. भगवंताने बुध्दी देऊन सर्वांना स्वतंत्रता दिली आहे. कोणत्या मार्गाने चालायचे? हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. गीता-भागवताचे श्रवण केल्याने कल्याणच होते, असे श्रीमान रेवतीनंदन दास यांनी सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## माझे चित्त तुझ्या पाया

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स




तुमचे नाव राजा. पण नुसते नाव राजा म्हणून का होईल तुमचा गाजावाजा ? त्यापेक्षा काही चांगले काम करा. लोकांच्या डोळ्यांत भरा. लोक तुमच्याभोवती होतील गोळा भराभरा. एरवी नुसते नाव टिकत नाही. पण केलेला काम मिटत नाही. म्हणूनच म्हटलं आहे, की नुसते नाव नको गोड, त्याला कामाचीही हवी जोड. एरवी जगाला तर तुम्हाला सदा नावेच ठेवायची खोड. केवळ स्वार्थाशी नाते तोड. दुसऱ्याचं काम करताना प्रसंगी होऊ दे पदरमोड. महाभारतात हेच म्हटले आहे.

पांडुरंगा, एकदा तुला पाहिले. मग पाऊल मागे नाही फिरले. मन तुझ्या पायी जडले. पाण्यात जर मीठ कालवले, तर काढता येईल का ते वेगळे? तुझे नाते जुळले. मरण आले, तरी ते पथ्यावरच पडले. हे प्राणपाखरू संसारदुःखातून मुक्त झाले. तेव्हा जगाच्या कल्याणाचे काम करावे. पण कल्याणाचे काम करताना भानावर असावे, एवढे पथ्य पाळावे.

एका डॉक्टरची गोष्ट आहे. तो वेड्यांना बरे करायचा. आयुष्यभर वेड्यांशीच संबंध. त्यांना बरे करणे एवढाच जिवाला ध्यास. सकाळपासून संध्याकाळपर्यंत रोज भेटायचे ते वेडेच. डॉक्टरच्या ध्यानिमनी एकच ओढ, की त्यांच्यावर उपचार करायचे. डॉक्टरांना स्वतःच्या कर्तृत्वाची. खात्री. ते म्हणायचे, मी त्याला दुरुस्त करीन. ते विद्यार्थ्यांना शिकवीत, तेव्हाही खात्रीनं म्हणत, मी त्याला दुरुस्त करीन.

एकदा विद्यार्थी त्यांना म्हणाले, सर तुमच्या जीवनात सदा हे वेडेच आले. जगात तुम्हाला कुणी शहाणे नाही कधी भेटले?

डॉक्टर म्हणाले, नाही ना?

त्यावर विद्यार्थी म्हणाले, पण समजा कुणी कधी भेटले तर ?

डॉक्टर म्हणाले, तर आणा त्यांना माझ्याकडे. मी त्यांना त्वरित दुरुस्त करीन.

पण खरंच आज जगात शहाणेच वागतात वेड्यासारखे. नाही का? – **किशोर गांधी**

### मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये

# राजस्थानचा अरुण कटारिया विजयी तर उपविजेता रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव

नगर – शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा २७ ते ३१ मे या दरम्यान पाच दिवस लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या विजेत्यांना जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पाच लाख रु. रोख रक्कम प्रोत्साहन म्हणून देण्यात आली. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, स्पर्धेचे पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल टापसे, अमरीश जोशी, शिशीर इंदुरकर, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराथी, चेतन कड, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, कौस्तुभ ठोंबरे, रोहिणी आडकर, डॉ. स्मिता वाघ, संजय खडके, नवनीत कोठारी आदी होते.



या स्पर्धेला देशभरातून २७५ पेक्षा जास्त बुद्धिबळ खेळाडू सहभागी होते. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवले. अनेक रोमहर्षक व उत्कंठा पूर्ण डाव नगर करांना पाहता आले. या स्पर्धेत १४० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले होते. ही या स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की देशभरातील नामांकित बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून अवघ्या साडेपाच वर्षाच्या बाल बुद्धिबळपटू पासून ते ९२ वर्षीय जेष्ठ खेळाडू पर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावलेले आहे. अहिल्यानगर मध्ये प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावरील फिडे रेडींग स्पर्धा होत आहे बुद्धिबळाचा प्रसार आणि प्रचार वाढवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून शंभर चेस बोर्ड खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे आमचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हा आहे यंदा रशियन ग्रँडमास्टर यांना बोलावून विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा खेळाडूंना मोठा फायदा झाला असल्याची भावना व्यक्त केली.

संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविकात सांगितले की या स्पर्धेचे प्रमुख आकर्षक म्हणजे रशियन ग्रँडमास्टर यांचा सहभाग त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला ऊर्जा अधिक उंचावला आहे विशेष म्हणजे यांनी एकाच वेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना खेळून उपस्थित त्यांची मने जिंकली.

या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे – मुख्य पारितोषिक प्रथम- अरुण कटारिया, द्वितीय- रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव, तृतीय- श्रीराज भोसले, चतुर्थ-किशन कुमार, पाचवे- विराज राणे, सहावे- श्रीवास्तव राघव, सातवे- प्रशांत नाईक, आठवे- युधार्थ नरुले, नववे- कबनूरकर ऋषिकेश, दहावे- बी आर अरविंद, अकरावे- हरिकेश चव्हाण, बारावे- सुजल लंबोरे, तेरावे- आर्यन चक्रबोरते, चौदावे- शुभम चांडक, पंधरावे- रुपेश पाडवे.

बेस्ट १८०० बीलो प्रथम-अनय महामुनी, द्वितीय- नीली पुनीत, तृतीय- सार्थक भापकर, चतुर्थ- मनोज कुमार, पाचवे- श्याम अवघड.,

बेस्ट १६०० बीलो प्रथम- कोहिनूर भुवन, दृतिय- प्रदीयोत मिश्रा, तृतीय- अर्णव इवना, चतुर्थ- आयुष ठोंबरे, पाचवी- करवा व्यंकटेश.,

अन रेटेड कॅटेगिरी प्रथम-ओम पाबळ, द्वितीय- शार्दुल देऊळगावकर, तृतीय- देवदत्त पटवर्धन, चतुर्थ- वैभव पटवर्धन, पाचवे- अधिराज मेहत्रे.,

उत्कृष्ट महिला खेळाडू प्रथम- तनिष्क राठी, द्वितीय- अनीशा छजलानी, तृतीय- कृतिका पुस्तके, चतुर्थ- योषणा मंडळीच्या, पाचवे- सई बावणेर.,

५५ वर्षापुढील खेळाडू प्रथम- विनोदकुमार नैर, द्वितीय- धनंजय काकडे, तृतीय- मिलिंद पारले, चतुर्थ- लाल गोविंद कोलपेक, पाचवे- टीव्ही सुब्रमण्यम.,

बेस्ट अहिल्यानगर खेळाडू प्रथम- जीनम संकलेचा, द्वितीय- सुन्या गुगळे, तृतीय- ईशान चोरडिया, चतुर्थ- स्वराज काळे, पाचवे- अश्विन चांदगडे.,

बेस्ट अहिल्यानगर तालुका खेळाडू प्रथम- अय्या आयुष, द्वितीय- विराज मच्छे, तृतीय- राजवीर शिंदे, चतुर्थ- सार्थक शिंदे, पाचवे- राम दले.,

१५ वर्षाखालील खेळाडू प्रथम- ओजस हिवरे, द्वितीय-सम्यक जैन, तृतीय- रितेश के, चतुर्थ- आरुष मथुर, पाचवे- प्रतीक तुमनपिल्ली.,

१३ वर्षाखालील खेळाडू प्रथम- रियांश द्विवेदी, द्वितीय- कावीस लिमये, तृतीय- शंकर स्वराज, चतुर्थ- आयान चक्रबोर्टी, पाचवे- यश तुरकी.,

११ वर्षाखालील खेळाडू प्रथम-वरद पाटील, द्वितीय- सर्वज्ञ बालगुडे, तृतीय- आभित्य दायमा, चतुर्थ- अन्वित गायकवाड, पाचवे- विजय विश्रुते.,

९ वर्षाखालील खेळाडू प्रथम- करण खारडे, द्वितीय- अभंग सोनवणे, तृतीय- शर्विल भागुरकर, चतुर्थ- संकेत पाटील, पाचवे- ओवी राजू मेरड.,

७ वर्षाखालील खेळाडू प्रथम- रुद्र जैन, द्वितीय- कृष्णा खरडे, तृतीय- देव वेद.


मनपा कर्मचारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना बाबासाहेब मुदगल. (छाया : लहू दळवी)

# महापालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेकडून सभासदांना १० टक्के लाभांश

## ७३ लाखांचा नफा, २९.५० कोटी रुपयांचे कर्जवाटप, संस्थेची ११४ वी वार्षिक सभा उत्साहात : बाबासाहेब मुदगल यांची माहिती

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेने चालू आर्थिक वर्षात संस्थेने सभासदांना १० टक्के लाभांश (डिव्हिडंड) जाहीर केला आहे. तसेच संस्थेमार्फत २९ कोटी ५० लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून संस्थेचे भागभांडवल ५ कोटी १६ लाख रुपयांपर्यंत पोहोचले आहे. संस्थेकडे सुमारे ८ कोटी रुपयांच्या ठेवी असून यावर्षी संस्थेला ७३ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

संस्थेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाली. सभेच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चौरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, विकास गीते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचालिका प्रमिलाताई पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी, अकाउंटंट संतोष गवळी आदी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेचे वाचन केले. त्यानंतर विषयपत्रिकेतील सर्व विषय सभासदांनी एकमताने मंजूर केले. पतसंस्थेला यंदाही अ वर्ग ऑडिट प्राप्त झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

मुदगल म्हणाले की, याशिवाय मयत सभासदांच्या कुटुंबियांना दिलासा देण्यासाठी ११ लाख ५० हजार ७०० रुपयांची कर्जमाफी करण्यात आली. वैद्यकीय मदत म्हणून तीन सभासदांना ७५ हजार रुपयांची आर्थिक मदतही देण्यात आली.

व्हाईस चेअरमन कैलास चौरे म्हणाले, चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेला अ वर्ग ऑडिट प्राप्त झाले असून संचालक मंडळ सभासदांच्या हिताचे निर्णय घेत आहे. पारदर्शकता, शिस्तबद्ध आर्थिक नियोजन आणि सभासदांचा विश्वास यामुळे पतसंस्थेने आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे. सभासदांच्या सहकार्याच्या बळावर संस्थेची आर्थिक स्थिती भविष्यात आणखी भक्कम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभेदरम्यान अनेक सभासदांनी मनोगत व्यक्त केले. संचालक मंडळाने केलेल्या पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभारामुळे पतसंस्थेची सातत्याने प्रगती होत असून सभासदांचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले. सभासदांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचेही यावेळी कौतुक करण्यात आले.

# साईदीप हिरोज व एसकेबी संघांचा विजय

### अंतिम फेरीत धडक



नगर – येथील वाकोडी परिसरातील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेत शनिवारी रंगतदार उपांत्य सामने खेळविण्यात आले. दोन्ही सामन्यांत खेडूंच्या उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजीचा थरार पाहायला मिळाला.

पहिल्या उपांत्य सामन्यात टॉपर्स क्रिकेट अकॅडमी व साईदीप हिरोज यांच्यात लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईदीप हिरोज संघाने २५ षटकांत ५ बाद १३९ धावांचा भक्कम डोंगर उभारला. संघाकडून आदित्य इथापे याने फलंदाजी करत ७५ धावांची खेळी साकारली.

विजयासाठी १४० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या टॉपर्स क्रिकेट अकॅडमी संघाला साईदीप हिरोजच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरता आला नाही. संपूर्ण संघ १७.१ षटकांत अवघ्या ४१ धावांवर गारद झाला. त्यामुळे साईदीप हिरोज संघाने तब्बल ९८ धावांनी दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. उत्कृष्ट फलंदाजीबद्दल आदित्य इथापे याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात आर एल अकॅडमी व एसकेबी संघ आमनेसामने आले. प्रथम फलंदाजी करत आर एल अकॅडमी संघाने ९ गड्यांच्या मोबदल्यात ११६ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात एसकेबी संघाने आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत १८.२ षटकांत १ बाद ११८ धावा पूर्ण केल्या आणि ९ गडी राखून सहज विजय मिळवला. संघाकडून धनंजय जरे याने ४१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# इरादा पक्का, हौसला बुलंद आणि मेहनत करण्याची तयारी असेल, तर प्रत्येक गोष्ट शक्य

### सीए डॉ. अशोककुमार पगारिया यांचे प्रतिपादन

नगर – मनात जे कोणतेही करिअर ठरवाल आणि ते मिळवण्यासाठी कठोर परिश्रम कराल, तर तुमचे ध्येय निश्चितच साध्य होऊ शकते. आता तुम्ही कोणतेही करिअर निवडा, त्यासाठी इतकी मेहनत करा, इतका अभ्यास करा की तुमचे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल. ज्या क्षेत्रात तुम्हाला रुची आहे, ज्या गोष्टीची तुम्हाला आवड आहे, त्याच अभ्यासक्रमाची निवड करणे तुमच्या यशासाठी अधिक उपयुक्त ठरेल. कारण त्या अभ्यासक्रमाचा अभ्यास तुम्ही मनापासून, आवडीने आणि सातत्याने कराल आणि यश संपादन कराल, असे प्रतिपादन सीए डॉ. अशोककुमार पगारिया यांनी केले.


आनंदधाम येथे दहावी व बारावीच्या सकल जैन समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह व करियर गायडन्स कार्यक्रमात विद्यार्थी व पालक सहभागी झाले होते.

आनंदधाम येथे दहावी व बारावीच्या सकल जैन समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह व करियर गायडन्स कार्यक्रमात विद्यार्थी, पालकांचा सहभाग झाला. आचार्य भगवंत श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी महाराज, प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी महाराजांच्या सत प्रेरणेने वीर सेना व श्री तिलोक रत्न जैन स्था. परीक्षा बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आलोकऋषिजी म. यांनी मंगलाचरण, नवकार मंत्राचा जप, आनंद धून चा जप केला. कुमारी दिया गांधी यांनी डॉ. अशोक पगारिया यांचा बायोडाटा वाचून दाखवला, तसेच सर्वांचे स्वागत केले.

विज्ञान शाखेत डॉक्टर, इंजिनिअर, आर्किटेक्ट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर कायदा, वकिली, पायलट अशा अनेक करिअरच्या संधी तुमच्या पात्रतेनुसार उपलब्ध आहेत.

वाणिज्य शाखेत सीए, सीएस, कॉस्ट अकाउंटंट, एमबीए, सीएफए, एलएलबी, फॉरेन्सिक अकाउंटिंग व ऑडिटिंग यांसारख्या संधी उपलब्ध आहेत.

कला शाखेत बी.ए., एम.ए., एलएलबी तसेच यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षा देऊन प्रशासकीय अधिकारी बनता येते. तसेच परदेशी भाषा पदवी अभ्यासक्रम, पायलट, एअर होस्टेस, चित्रपट अभिनेता, दिग्दर्शक यांसाठीही विविध डिप्लोमा व पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

तुम्ही कोणतेही करिअर निवडा, ते साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि बुलंद हौसला आवश्यक आहे.

एका शायरने अगदी योग्य म्हटले आहे-

**मंजिले उन्हींको मिलती है, जिनके सपनों में जान होती है**
**उड़ान केवल पंखोंसे नहीं दोस्तों, हौंसलों से होती है**

श्री आलोकऋषीजी महाराज साहेबांनी युवा वर्गाला तीन गोष्टी लक्षात ठेवायला सांगितल्या, संस्कार, संघटन आणि सेवा. त्यांनी सांगितले

**जहा संघटन होता है, वहा शक्ती होती है ।**
**जहा सेवा होती है वहा श्रद्धा होती है और**
**जहा धर्म होता है, वहा मानता का कल्याण होता है ।**

डॉ. अशोक पगारिया, सचिन डागा, पंकज गुंदेचा, दीपक कासवा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रतिलाल कटारिया, संतोष गांधी, मदन मुनोत तसेच लता बोरा, मनिषा मुनोत, सुशिला बाफना इत्यादींची यांची विशेष उपस्थिती होती. दहावी व बारावी विशेष गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जैन विश्व या वेबसाईटचे विमोचन व वीर सेना लोगोचे विमोचन महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज साहेब यांच्या सानिध्यात झाले. यश चोरडिया, अथर्व पिपाडा, रिया गांधी, दिया गांधी, अंकुश चव्हाण, स्वराज गांधी इत्यादींनी कार्यक्रमाला यशस्वी बनवण्यासाठी मदत केली.

# अनुसूचित जाती अ-ब-क-ड उपवर्गीकरण विरोधात महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाज एकवटला : राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

नगर – महाराष्ट्र शासनाने म ागासवर्गीय समाजातील आरक्षणाचे अ–ब–क–ड उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आणला असून या निर्णयाला महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाजाकडून तीव्र विरोध व्यक्त करण्यात येत आहे. या उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रभरात जनजागृती व प्रचार–प्रसार करण्याचा निर्धार मुख्य प्रवर्तक विजय घासे यांनी नुकत्याच झालेल्या आळंदी येथील राज्यव्यापी बैठकीत व्यक्त केला. शासनाच्या प्रस्तावामुळे अनुसूचित जातींमध्ये संभ्रम निर्माण होत असून समाजात तेढ वाढविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.


महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीय समाजातील आरक्षणाचे अ–ब–क–ड उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आणला असून या निर्णयाला महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाजाकडून तीव्र विरोध व्यक्त करण्यात येत आहे.

चर्मकार समाजाचे म्हणणे आहे की, शासनाने हे उपवर्गीकरण धोरण नेमके काय आहे, याचा समाजावर काय परिणाम होईल, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समाजासमोर मांडलेली नाही. कोणताही अभ्यास, सखोल चर्चा किंवा समाज बांधवांचे मत जाणून न घेता शासन हा निर्णय घाईत लागू करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला.

या उपवर्गीकरणामुळे मागासवर्गीयांच्या सुमारे ५९ जातींमध्ये आरक्षण विभाजन करण्याचा प्रयत्न सुरू असून, यामुळे मांग, महार, चांभार यांसारख्या समाजांम ध्ये फूट पाडण्याचा कट असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. सामाजिक ऐक्य धोक्यात आणणारे आणि समाजविरोधी ठरणारे हे धोरण असल्याचे आरोप समाजाकडून करण्यात आले.

समाजहिताच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असून शासनाने तात्काळ हा निर्णय थांबवून सकल चर्मकार समाजाशी चर्चा करावी, अशी मागणी समाज बांधवांकडून करण्यात आली. शासनाने एकतर्फी निर्णय न घेता सर्व घटकांशी संवाद साधूनच पुढील भूमिका घ्यावी, असे मत अनेकांनी मांडले.

उपवर्गीकरणाच्या विरोधातील या बैठकीचे आयोजन समस्त हराळे वैष्णव समाज धर्मशाळा संस्थानचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी देवाची आळंदी येथे केले होते. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून समाजबांधव उपस्थित राहिल्याने ही बैठक ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बैठकीदरम्यान शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत लवकरच मुंबई येथे राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, अशी घोषणा सकल चर्मकार समाजाच्या वतीने करण्यात आली. समाजाच्या हक्कांसाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या राज्यव्यापी बैठकीस अध्यक्षस्थानी बबनराव घोलप तर तसेच प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय रविदासिया धर्म संघटनेचे संस्थापक सुखदेव महाराज वाघमारे, मा. आ. बाबुराव माने, मा. आ. भाऊसाहेब कांबळे, ॲड. नारायणराव गायकवाड, राम कदम, संजय खामकर, चंद्रकांत कांबळे, सूर्यकांत गवळी, सुरेश पोटे आदी उपस्थित होते.

याशिवाय जयदेव इसवे, रवींद्र खैरे, गजानन लिंभोरे राजेंद्र कांबळे यांच्यासह अनेक युवा नेते आणि महाराष्ट्रातील विविध भागांतील समाज प्रतिनिधी बैठकीत सहभागी झाले होते. उपस्थितांनी समाज एकजुटीचा निर्धार व्यक्त करत शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविला.

बैठकीत वक्त्यांनी उपवर्गीकरणामुळे समाजामध्ये निर्माण होणाऱ्या संभाव्य परिणामांवर सविस्तर भाष्य केले. समाजातील ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी सर्व घटकांनी संघटित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. शासनाने तातडीने समाजाच्या भावना लक्षात घेऊन निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी पुन्हा एकदा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबा कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कानडे व दिनेश जाधव यांनी केले, तर समस्त हराळे वैष्णव समाज धर्मशाळा विश्वस्तांच्या वतीने आभार मानण्यात आले. राज्यभरातील समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे बैठक यशस्वी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

बैठकीस आहिल्यानगर मधून समाजभूषण बाबुलाल शिंगरे आणि सुरजमल डोंगरे उपस्थित होते.


सावन कृपाल रुहानी मिशन अहिल्यानगर शाखेच्या वतीने संत दर्शन सिंह महाराजांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त भाविकांना थंडाईचे वाटप करताना जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप व माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर.

# दर्शन सिंह महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त थंडाईचे वाटप

नगर – अध्यात्मिक क्षेत्रात सावन कृपाल रुहानी मिशन या जागतीक स्तरावर काम करणाऱ्या संस्थेचे संस्थापक महान सूफी संत व शायर संत दर्शन सिंह महाराजांच्या ३७ व्या पुण्यतिथी पुण्यतिथीनिमित्त भाविकांना थंडाईचे वाटप करण्यात आले. अहिल्यानगर सावन कृपाल रुहानी मिशनचा शाखेच्या वतीने नगर शहरात व वाळूंज येथील आश्रमात हा सामाजिक उपक्रम रावण्यात आला. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप व माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांच्या हस्ते मिस्कीन मळा येथे भाविकांना थंडाईचे वाटप करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर सावन कृपाल रुहानी मिशनचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, सुनील मिस्कीन, राजेश कुकरेजा यांच्या सह सेवेकरी उपस्थित होते.

सचिन जगताप म्हणाले, भारतीय संकृतीमध्ये सेवेला अनन्यसाधारण महत्व आहे. साधुसंतांनी विचाराद्वारे हाच विचार मांडून मार्गदर्शन केले आहे. दर्शन सिंह महाराजांनी सुद्धा सेवेचा संदेश दिला आहे. अहिल्यानगर सावन कृपाल रुहानी मिशनच्या माध्यमातून विविध उपक्रमाद्वारे विविध प्रकारचे सेवा कार्य होत असल्याने हे काम कौतुकास्पद आहे. या सेवा कार्यात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात शामलाल छाबरिया म्हणाले, महान व प्रसिद्ध सूफी संत–शायर दर्शनसिंह महाराज यांनी आपले गुरु हुजूर बाबा सावन सिंह महाराज व परम संत कृपाल सिंह महाराज यांच्या स्मरणार्थ १९७४ मध्ये 'सावन कृपाल रुहानी मिशन' ची स्थापना केली. याद्वारे अध्यात्माला त्यांनी सकारात्म क अध्यात्माच्या रूपात सादर केले. ध्यानधारणेच्या अभ्यासाद्वारे ऋषी–मुनीं प्रमाणे प्रत्येकाने परमेश्वराला प्राप्त करावे, असा संदेश त्यांनी दिला होता. आता त्यांच्या पश्चात संत राजिंदर सिंह महाराज या अध्यात्मिक कार्याचा वारसा सांभाळत संपूर्ण विश्वभर काम करीत आहेत.

सुशील बजाज म्हणाले, सावन कृपाल रुहानी मिशन तर्फे मानव कल्याणासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये रक्तदान शिबीर, विनामूल्य मोती बिंदू ऑपेरेशन, मोफत आरोग्य चिकित्सा शिबीर, दिव्यांग बंधू–भगिनींसाठी विविध उपकरणांचे वितरण, या व्यतिरिक्त गरीब गरजू विद्यार्थ्यांना संत राजिंदर सिंह वोकेशनल ट्रैनिंग सेन्टर मध्ये आत्मनिर्भर बनविण्याकरिता अनेक प्रकारचे कोर्सचे विनामूल्य प्रशिक्षण देत आहोत.

# आरोग्यासंदर्भात सोशल मीडियावरील माहितीऐवजी महिलांनी तज्ज्ञ डॉक्टरांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन घ्यावे

## डॉ. अमोल जाधव यांचे आवाहन; प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत नागरदेवळे येथे गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी

नगर – प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला गर्भवती महिलांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येते. या उपक्रमाअंतर्गत सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे स्त्डॉरी रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ही तपासणी झाली.

या तपासणीमध्ये डॉ. जाधव यांनी गर्भवती महिलांमधील हाय रिस्क प्रेग्नन्सी ओळखणे, रक्तदाब कमी किंवा जास्त असणे, रक्तातील हिमोग्लोबिन कमी असणे, शुगर, सूज, तसेच आईच्या पोटातील बाळाची वाढ कमी असणे किंवा पाणी कमी असणे अशा विविध समस्यांचे निदान करून योग्य उपचार मार्गदर्शन केले. तसेच सुरक्षित व नॉर्मल डिलिव्हरीसाठी आवश्यक असणारे आहार, व्यायाम, जीवनशैली आणि काळजी याबाबत महिलांचे समुपदेशन करण्यात येते. गर्भधारणेपासून ते प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा यासाठी सरस्वती हॉस्पिटल सातत्याने कार्यरत आहे. महिलांनी नियमित तपासणी करून आई व बाळाच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी. सध्या सोशल मीडियावर विविध प्रकारचे रिल्स आणि माहिती मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. मात्र प्रत्येक माहिती सर्वांसाठी योग्य असेलच असे नाही. अनावश्यक किंवा चुकीच्या माहितीकडे पाहून मनात भीती निर्माण करून घेऊ नये तसेच प्रत्येक गोष्ट स्वतःशी जोडून कॉम्प्लिकेशनची चिंता करू नये. कोणतीही शंका असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.


सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे स्त्डॉरी रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा ९ वर्षांच्या वाटचालीत डॉ. अमोल जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जपत शासनाच्या विविध आरोग्य योजनांतर्गत महिला आरोग्याचा जागर केला आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात शिबिरे घेऊन महिलांना आरोग्य विषयक बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे.

गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा यासाठी सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सातत्याने कार्यरत आहे. बाळंतपणात आईच्या गर्भात असलेल्या बाळाची वाढ, त्याचे आरोग्य तपासणीसाठी सोनोग्राफी महत्त्वाची असते. सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आता सध्याच्या काळातील सर्वात आधुनिक ॲडव्हान्स ५ डी सोनोग्राफी मशीन (ॲनोमली स्कॅन) कार्यान्वित झाले आहे. यामुळे गर्भातील बाळाच्या आरोग्याचे अत्यंत सखोल व अचूक परीक्षण शक्य झाले आहे. हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले असून अधिक सुरक्षित, इन्फेक्शन कंट्रोल आणि उच्च दर्जाची शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. आई व बाळाला सुरक्षित संसर्ग विरहित वातावरण मिळण्यासाठी खास डिझाईन केलेले सुसज्ज डिलिव्हरी रूम साकारण्यात आले आहे. याशिवाय प्रसूती अधिक सुलभ, सुरक्षित आणि कम्फर्टेबल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात. सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये फक्त नवा जीव जन्माला येत नाही तर आईने पाहिलेले गोड स्वप्न प्रत्यक्षात उतरते. या सुंदर क्षणांचे साक्षीदार होण्याची संधी आम्हाला लाभते, असेही डॉ. अमोल जाधव यांनी सांगितले.

# नृत्यकलेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल नगर येथील ऋग्वेदा रोडेला 'राष्ट्रीय कलारत्न' पुरस्कार जाहीर

नगर – नृत्य, अभिनय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कु. ऋग्वेदा वर्षा सचिन रोडे हिला बालगटातील 'राष्ट्रीय कलारत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १६ ऑगस्ट रोजी शिर्डी येथे विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या वतीने आयोजित 'साहित्य संस्कृती संगम संमेलन' मध्ये प्रदान करण्यात येणार आहे.



ऋग्वेदा ही अहिल्यानगर आकाशवाणी केंद्रातील नैमित्तिक उद्घोषिका प्रा. सौ. वर्षा पाठक रोडे यांची कन्या असून ती टायनी टॉट्स शाळेची विद्यार्थिनी आहे. लहान वयातच तिने विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभाग घेत आपल्या कलागुणांची छाप उमटविली आहे. तिच्या नृत्यकलेतील सातत्यपूर्ण यशाची दखल घेत हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

ऋग्वेदा ही नृत्य झंकार अॅक्डमीची विद्यार्थिनी असून अॅक्डमीच्या संचालिका प्रिया ओगले यांच्या मार्गदर्शनाखाली तिने विविध ग्रुप डान्स स्पर्धांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदविला आहे. तिच्या सादरीकरणांनी अनेक कार्यक्रमांमध्ये रसिकांची दाद मिळविली असून नृत्यकलेबरोबरच अभिनय क्षेत्रातही तिने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

गेल्या वर्षी ज्येष्ठ रंगकर्मी प्रविण भारदे यांच्या तीन नाटकांमध्ये ऋग्वेदाने भूमिका साकारल्या होत्या. या नाटकांमध्ये तिला ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे आणि प्रविण भारदे यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. तसेच अखिल भारतीय नाट्य संमेलनात तिचा सहभाग राहिला होता, ज्यामुळे तिच्या कलात्मक व्यक्तिमत्त्वाला अधिक व्यापक व्यासपीठ लाभले.

# समाजातील गरजूंना सन्मानाने जीवन जगता आले पाहिजे

## योगेश बजाज यांचे प्रतिपादन

नगर – साधूसंतांची भूमी असलेल्या अहिल्यानगरला निस्वार्थी भावनेने समाजासाठी कार्य करणारांची मोठी परंपरा आहे. समाजातील गरजूंना सातत्याने मदतीचा हात देऊन कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये जैन वात्सल्य संस्था अग्रेसर आहे. गरजूंना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी संस्था अखंड योगदान देत आहे. अशा कार्यामुळे खऱ्या अर्थाने संतांची शिकवण अंमलात येत असते. या संस्थेच्या कार्यात योगदान देताना मनापासून आनंद मिळतो. आज आमचा परिवार पुण्यात स्थायिक झाला असला तरी नगरच्या मातीशी असलेले ऋणानुबंध कायम आहेत, अशा भावना योगेश प्रकाश बजाज (पुणे) यांनी व्यक्त केल्या.


योगेश प्रकाश बजाज परिवारातर्फे नगरमधील जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यासाठी १ लाख ५६ हजार रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी दीपा योगेश बजाज, मिहिका योगेश बजाज उपस्थित होत्या.

## जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यासाठी बजाज परिवारातर्फे १ लाख ५६ हजारांची आर्थिक मदत

मूळचे नगरचे व सध्या पुणे येथे स्थायिक झालेले योगेश प्रकाश बजाज परिवारातर्फे नगरमधील जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यासाठी १ लाख ५६ हजार रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी दीपा योगेश बजाज, मिहिका योगेश बजाज उपस्थित होत्या. या देणगी बद्दल बजाज परिवाराचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय प्रमुख मार्गदर्शक अशोक (बाबूशेठ) बोरा, जैन वात्सल्य संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, मोहनलाल मानधना, अमृत मुथा, ईश्वर बोरा, विनित बोरा आदी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा म्हणाले की, कर्तृत्वाला दातृत्वाची जोड मिळाली तर समाजासाठी भरीव कार्य करता येते. प्रत्येकाने समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जैन वात्सल्य संस्था समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने गरजूंसाठी विविध उपक्रम राबवित आहे. दर महिन्याला गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वितरित करण्यात येते. हा सामाजिक उपक्रम निरंतर चालू आहे. पुण्यात स्थायिक झालेल्या बजाज परिवाराने आपल्या मातीशी जुळलेली नाळ कायम राखत संस्थेच्या कार्यासाठी भरीव आर्थिक मदत केली आहे. अशा दातृत्वाची आज खरी गरज आहे.

ईश्वर बोरा यांनी आभार मानले.

# महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी घरी शिवणकाम देणार

## रूपाली करांडे यांचे प्रतिपादन; राही फाउंडेशनचा महिला सक्षमीकरणाचा उपक्रम

नगर – महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी राही फाऊंडेशनच्या माध्यमातून शिवणकामचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. घरच्या घरी पाचशे महिलांना रोजगार देणार असल्याचे प्रतिपादन राही फाऊंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे यांनी केले.


राही फाऊंडेशन आयोजित महिला स्वयंरोजगार प्रकल्पाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना रूपाली करांडे.

महिला स्वयंरोजगार प्रकल्पाच्या उद्‌घाटन प्रसंगी रूपाली करांडे बोलत होत्या. यावेळी जय युवा ॲकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, भाऊसाहेब पादीर, उडान संस्थेचे अध्यक्षा ॲड. आरती शिंदे, गौरी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा गीता टेमक, अंगणवाडी सेविका शोभा मोढवे, राही फाउंडेशनचे संचालक निलेश गर्जे आदी उपस्थित होते.

पुढे करांडे म्हणाल्या की, कौशल्य विषयक फक्त प्रशिक्षण घेऊन उपयोग नाही, तर त्या प्रशिक्षणाचा उपयोग भविष्यात स्वयंरोजगार सुरू करता आला पाहिजे. गरजू महिलांच्या हाताला काम पाहिजे म्हणूनच राही फाउंडेशनने हा प्रकल्प हाती घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड.महेश शिंदे म्हणाले की, कौशल्य विकास प्रशिक्षणामधून स्वयंरोजगार ही काळाची गरज आहे. सध्याच्या महागाईच्या काळात बेरोजगारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यावर मात करून महिला सक्षम करण्यासाठी राही फाऊंडेशन महिलांना प्रत्यक्ष घर बसल्या शिवणकाम देऊन स्वयंरोजगारीत करण्यासाठी हा प्रकल्प राबवित असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणासाठी बुरुडगाव, आदर्श गाव मांजरसुंबा येथे महिलांची बैठक घेण्यात आली. यावेळी युवती व महिलांचा सहभाग मिळाला. याप्रसंगी पिशव्या, टॉप, शाळेचे गणवेश आणि विविध वस्तू शिवणासाठी देण्यात येणार असल्याचे रूपाली करांडे यांनी सांगितले.

यावेळी शोभा मोढवे, श्वेता गायकवाड, आशा साबळे, प्रिया कुलट, सविता ससाणे, संगीता घोडके, वसुधा नरसाळे, अनिता घोडके, कोमल निमसे, अमृता शिंदे, नंदा शिंदे, प्रियंका खंदारे, सोनल काळे, हिरा रोडे, स्वाती लांगोरे, पुनम मोढवे, मोहिनी कुलाळ, मीनाक्षी कदम, जयश्री वाघमारे, ज्योती वाघमारे, योगिता कदम, शुभांगी वैराळ, रेखा कदम, अश्विनी दांगट, अश्विनी कदम, रूपाली शिंदे, प्राजक्ता कदम, उज्वला वाघमारे, शीतल जगधने, कांचन वाघमारे, वैशाली वाघमारे, सायली कदम, कोमल वाघमारे, योगिता कदम, हिना शेख, गुलनाज शेख आदींसह महिलांची उपस्थिती होती.

महिलांनी शिवणकामाच्या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी राही फाऊंडेशन ९९२१७६५३५३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अहिल्यानगर तालुक्यातील कापूरवाडी येथे पंचवीस एकर जागा निश्चित

नगर – जिल्ह्याच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया'साठी नगर तालुक्यातील कापूरवाडी येथे २५ एकर जागा निश्चित करण्यात आली असून, जिल्ह्याच्या पहिल्या सरकारी मेडिकल कॉलेजचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून महाविद्यालयासाठी ४४८ पदांची निर्मितीही मंजूर केली आहे.


खा. निलेश लंके

जिल्ह्यात सरकारी मेडिकल कॉलेज व्हावे, यासाठी खासदार डॉ. निलेश लंके गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत होते. दिल्ली ते मुंबई विविध स्तरांवर बैठका घेऊन त्यांनी जिल्ह्याची आवश्यकता शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्यासमोरही त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्याची परिस्थिती मांडत मेडिकल कॉलेजची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर राज्य शासनाने प्रकल्पाला गती देत आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतले आहेत.

महाविद्यालयासाठी सुरुवातीला नालेगाव, अरणगाव आणि कापूरवाडी या ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर सर्व निकषांचा विचार करून कापूरवाडी येथील २५ एकर जागा अंतिम करण्यात आली आहे. या ठिकाणी भविष्यात अत्याधुनिक सुविधा असलेले मेडिकल कॉलेज, संलग्न रुग्णालय, विद्यार्थी वसतिगृह आणि संशोधन सुविधा उभारल्या जाणार आहेत.

चालू शैक्षणिक वर्षापासून १०० एमबीबीएस जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याची शक्यता आहे. नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयाचे तात्पुरते कामकाज जिल्हा आयुष रुग्णालयातून चालविण्यात येणार आहे. तसेच पुढील सात वर्षांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) मेडिकल कॉलेजकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या मेडिकल कॉलेजमुळे जिल्ह्यात तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढणार असून ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच आधुनिक उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई किंवा इतर शहरांकडे जाण्याची गरज कमी होणार आहे. जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारा हा ऐतिहासिक प्रकल्प ठरणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

आयकर विवरणपत्र (आयकर परतावा किंवा आयटीआर) भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, करदात्यांनी फॉर्म भरताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. घाईघाईत किंवा अपुऱ्या माहितीच्या आधारे आयटीआर भरल्यास प्राप्तिकर विभागाकडून नोटीस येण्याचा मोठा धोका असतो. कोणतीही अडचण टाळण्यासाठी आयटीआर भरण्यापूर्वी काही महत्त्वाच्या चुका टाळणे अत्यंत गरजेचे आहे.

## ‘आयटीआर’मध्ये भरताना चुका झाल्यास कारवाई होते का?

**अपुऱ्या माहितीच्या आधारे घाईघाईने आयटीआर भरणे**

आयटीआर फॉर्म ऑनलाइन उपलब्ध होताच अनेक करदाते अगदी सुरुवातीच्या काळातच तो भरण्याची घाई करतात. परंतु, आर्थिक वर्ष संपल्यानंतर लगेचच सर्व कंपन्या किंवा वित्तीय संस्थांचा टीडीएस (टॅक्स डिडक्टेड अॅट सोर्स) डेटा प्राप्तिकर विभागाच्या पोर्टलवर अपडेट झालेला नसतो. साधारणपणे मे महिन्याच्या अखेरपर्यंत किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हा डेटा पूर्णपणे जोडला जातो. जर डेटा अपडेट होण्यापूर्वीच आयटीआर दाखल केला, तर तुमच्या दाव्यात आणि विभागाच्या रेकॉर्डमध्ये तफावत निर्माण होऊन नोटीस येऊ शकते.




■ ‘एआयएस’कडे दुर्लक्ष करणे

प्राप्तिकर विभागाकडून करदात्याच्या सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद ‘एआयएस’ (अखड) आणि ‘टीआईएस’ मध्ये ठेवली जाते. यामध्ये वर्षभरात मिळालेले बँक व्याज, लाभांश (डिव्हिडंड), शेअर्स किंवा म्युच्युअल फंडमधील खरेदी-विक्री आणि इतर मोठ्या व्यवहारांची सविस्तर माहिती असते. आयटीआर भरताना या विवरणातील आकडेवारी आपल्या कागदपत्रांशी जुळवून पाहणे आवश्यक आहे. जर एआयएसमध्ये नोंदवलेले उत्पन्न आयटीआरमध्ये दाखवले नाही, तर इलेक्ट्रॉनिक पडताळणी प्रणालीद्वारे ते लगेच पकडले जाते.

■ फॉर्म २६एएसची पडताळणी न करणे

फॉर्म २६एएस हा करदात्याचा मुख्य कर कपात दस्तऐवज आहे. तुमच्या वेतनातून किंवा इतर उत्पन्नातून कापला गेलेला टीडीएस बँक किंवा कंपनीने सरकारी तिजोरीत जमा केला आहे की नाही, याची खात्री या फॉर्मद्वारे होते. आयटीआर भरण्यापूर्वी फॉर्म २६एएस मधील टीडीएसची

■ जाणून घ्या

रक्कम आणि आपल्या फॉर्म १६ मधील रक्कम तंतोतंत जुळत असल्याची खात्री करून घ्यावी. यामध्ये तफावत असल्यास कर परतावा (रिफंड) अडकू शकतो किंवा अतिरिक्त कराची मागणी केली जाऊ शकते.

■ सर्व बँक खात्यांची आणि उत्पन्नाची माहिती न देणे

अनेक करदात्यांचे एकापेक्षा जास्त बँकांमध्ये खाते असते. आयटीआर भरताना केवळ मुख्य खात्याची माहिती देणे आणि इतर खात्यांकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरते. नियमांनुसार, सर्व सक्रिय बँक खात्यांची माहिती देणे बंधनकारक आहे. याशिवाय, बचत खात्यावर मिळणारे व्याज किंवा फिक्स्ड डिपॉझिटवरील व्याज हे करपात्र उत्पन्न मानले जाते. ‘इतर स्रोतांकडून मिळणारे उत्पन्न’ (इन्कम फ्रॉम अदर सोर्सेस) या पर्यायांतर्गत या सर्व व्याजाची अचूक नोंद करणे आवश्यक आहे.

■ चुकीचा आयटीआर फॉर्म निवडणे

प्राप्तिकर विभागाने वेगवेगळ्या उत्पन्नाच्या स्रोतानुसार आयटीआर १, आयटीआर २, आयटीआर ३ आणि आयटीआर ४ असे विविध फॉर्म निश्चित केले आहेत. उदाहरणार्थ, केवळ पगार आणि एका घरापासून उत्पन्न असणाऱ्यांसाठी आयटीआर १ आहे, तर शेअर्समधील भांडवली नफा (कॅपिटल गेन्स) असणाऱ्यांना आयटीआर २ किंवा व्यवसाय करणाऱ्यांना आयटीआर ३ अथवा ४ भरावा लागतो. जर चुकीचा फॉर्म निवडला, तर तो परतावा अवैध (डिफेक्टिव्ह रिटर्न) मानला जातो आणि प्राप्तिकर कायद्याच्या कलम १३९(९) अन्वये दुरुस्तीची नोटीस पाठवली जाते.

◆◆◆

---

निवृत्तीनंतरचे आयुष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आणि चिंतामुक्त असावे, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. परंतु, अनेकदा तरुण वयात किंवा नोकरीच्या सुरुवातीच्या काळात निवृत्तीच्या बचतीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. काही प्रमुख घटक आपल्या निवृत्तीच्या बचतीमध्ये त्वरित वाढ करण्यासाठी प्रवृत्त करणारे ठरतात. ते वेळीच समजून घेतल्यास भविष्यातील मोठी आर्थिक कोंडी टाळता येऊ शकते.



## निवृत्तीची शिदोरी मोठीच हवी

**१. वाढते आयुर्मान**

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती आणि सुधारलेल्या आरोग्य सुविधांमुळे मानवाचे सरासरी आयुर्मान सातत्याने वाढत आहे. दीर्घायुष्य लाभणे ही आनंदाची बाब असली, तरी आर्थिक दृष्टीने ती एक मोठी जोखीम मानली जाते. एखादी व्यक्ती वयाच्या ६० व्या वर्षी निवृत्त झाली आणि ती ८५ किंवा ९० वर्षांपर्यंत जगली, तर तिला निवृत्तीनंतर तब्बल २५ ते ३० वर्षे कोणत्याही नियमित उत्पन्नाशिवाय काढावी लागतात. तुमची निवृत्तीची शिदोरी लहान असेल, तर वाढत्या वयात पैसे संपण्याची भीती असते. हा विचारच गुंतवणूकदारांना त्यांची सध्याची बचत वाढवण्यास भाग पाडतो.

**२. वैद्यकीय खर्चातील प्रचंड वाढ**

वाढत्या वयासोबत आरोग्याच्या समस्या निर्माण होणे स्वाभाविक असते. सध्याच्या काळात सामान्य महागाईच्या तुलनेत वैद्यकीय क्षेत्रातील महागाईचा दर (हेल्थकेअर इन्फ्लेशन) दुप्पट वेगाने वाढत आहे. हॉस्पिटलायझेशन, शस्त्रक्रिया, औषधोपचार आणि गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च दिवसेंदिवस सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. केवळ साधे हेल्थ इन्शुरन्स कव्हर वाढत्या वयात पुरेसे ठरत नाही, कारण अनेक व्याधी किंवा खर्च विम्याच्या कक्षेत येत नाहीत. निवृत्तीनंतरचा एक मोठा हिस्सा केवळ आरोग्यावर खर्च होऊ शकतो, हे धक्कादायक वास्तव लक्षात आल्यावर निवृत्ती निधीचा आकार मोठा असणे किती गरजेचे आहे, हे पटते.

**३. जीवनशैलीतील बदल आणि महागाई**

निवृत्तीनंतर केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा एवढ्यापुरताच खर्च मर्यादित राहत नाही. आजची पिढी निवृत्तीनंतरही आपली जीवनशैली राखू इच्छिते. यामध्ये प्रवास करणे, छंद जोपासणे आणि सामाजिक सुखांचा उपभोग घेणे समाविष्ट असते. यासोबतच महागाईचा विचार केला

■ अर्थसल्ला

जातो, तेव्हा भविष्यातील खर्चाचे आकडे थक्क करणारे असतात. आज ज्या जीवनशैलीसाठी महिन्याला ५० हजार रुपये लागतात, तीच जीवनशैली २० वर्षांनंतर टिकवण्यासाठी महागाईमुळे कदाचित दीड ते दोन लाख रुपये लागू शकतात. हा गणिताचा फरक समजून घेताच, सध्या सुरू असलेली बचत पुरेशी नाही याची जाणीव होते आणि गुंतवणूकदार एसआयपी किंवा इतर माध्यमांतून आपली निवृत्ती गुंतवणूक वाढवण्याचा निर्णय घेतात.

◆◆◆

---



## अपेक्षेनुसार परतावा मिळवण्यासाठी...

नियोजित ध्येयानुसार योग्य फंडची निवड करणे आणि बाजारातील चढ-उतारांमध्येही संयम राखणे हा म्युच्युअल फंड गुंतवणुकीतील यशाचा मार्ग मानला जातो. परंतु, अनेकदा गुंतवणूकदार पोर्टफोलिओ तयार करताना होणाऱ्या काही चुकांमुळे दीर्घकाळ गुंतवणूक करूनही अपेक्षेप्रमाणे परतावा मिळत नाही. कोणत्या आहेत या चुका?

**१. अवाजवी विविधीकरण :** गुंतवणुकीतील जोखीम कमी करण्यासाठी ‘डायव्हर्सिफिकेशन’ म्हणजेच विविधीकरण करणे गरजेचे असते, हा नियम सर्वश्रुत आहे. परंतु, अनेक गुंतवणूकदार या नियमाचा अतिरेक करतात आणि आपल्या पोर्टफोलिओमध्ये २० ते ३० पेक्षा जास्त फंडस्चा समावेश करतात. एकाच श्रेणीतील (उदा. अनेक लार्ज कॅप किंवा अनेक मिड कॅप) विविध फंडस् खरेदी केल्यामुळे पोर्टफोलिओमध्ये ‘ओव्हरलॅपिंग’ वाढते. म्हणजेच, वेगवेगळ्या फंडांच्या नावाखाली शेवटी बाजारातील सारख्याच शेअर्समध्ये तुमचे पैसे गुंतवले जातात. यामुळे जोखीम कमी होत नाही, उलट पोर्टफोलिओचा परतावा सरासरी पातळीवर (अॅव्हरेज) येतो आणि चांगल्या फंडस्च्या कामगिरीचा फायदा मर्यादित होतो.

**२. केवळ मागील कामगिरीच्या (पास्ट परफॉर्मन्स) आधारे निवड :** अनेक गुंतवणूकदार फंड निवडताना केवळ गेल्या १ ते ३ वर्षांत कोणत्या फंडाने सर्वाधिक परतावा दिला आहे, हे पाहतात आणि त्यात गुंतवणूक करतात. हा गुंतवणुकीतील एक मोठा धोका ठरू शकतो. एखाद्या फंडाने भूतकाळात उत्कृष्ट कामगिरी केली म्हणजे तो भविष्यातही तसाच परतावा देईल, याची कोणतीही शाश्वती नसते. अनेकदा विशिष्ट बाजारपेठेच्या चक्रामुळे (मार्केट सायकल्स) एखादी थीम किंवा फंड तात्पुरती चांगली कामगिरी करतो. केवळ वरवरचा परतावा पाहण्याऐवजी फंडाची सातत्यपूर्ण कामगिरी (कन्सिस्टन्सी), फंड मॅनेजरची रणनीती आणि जोखमीचे व्यवस्थापन या घटकांचा अभ्यास करणे गरजेचे असते.

**३. सातत्याने पोर्टफोलिओमध्ये बदल करणे:** म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक ही प्रामुख्याने

■ गुंतवणूक


दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी असते. मात्र, काही गुंतवणूकदार बाजारातील प्रत्येक लहान-मोठ्या घसरणीला किंवा वाढीला पाहून आपल्या पोर्टफोलिओमध्ये सतत फेरबदल करत राहतात. एखादा फंड काही महिने अपेक्षेप्रमाणे चालला नाही की तो विकून दुसऱ्या फंडात जाणे, किंवा नवीन फंडस्च्या मागे धावणे यांमुळे गुंतवणुकीचे चक्र विस्कळीत होते. सततच्या खरेदी-विक्रीमुळे एक्झिट लोड आणि कर (कॅपिटल गेन्स टॅक्स) या रूपाने गुंतवणूकदाराचे आर्थिक नुकसान होते. पोर्टफोलिओचा आढावा वर्षातून एकदा किंवा दोनदा घेणे योग्य ठरते, मात्र त्यात वारंवार बदल करणे दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या आड येऊ शकते.

◆◆◆

---

## एसआयपीचा परतावा नकारात्मक दिसतोय?

व्हाईटओक कॅपिटल म्युच्युअल फंडच्या मे २०२६ मधील एसआयपी विश्लेषणात्मक अहवालानुसार, बीएसई सेन्सेक्स टीआरआयच्या रोलिंग एसआयपी परताव्याचा अभ्यास केला असता एक महत्त्वपूर्ण बाब समोर आली आहे. अनेक गुंतवणूकदार असा विचार करतात की एसआयपीमध्ये दीर्घकाळ गुंतवणूक केल्यास शेअर बाजार नेहमीच चांगला परतावा देतो. हे बरेचसे खरे असले तरी ‘दीर्घकाळ’ म्हणजे नक्की किती काळ, हे समजून घेणे आवश्यक आहे. केवळ नियमित गुंतवणूक करणे पुरेसे नसते; कमी कालावधीच्या एसआयपीमध्ये गुंतवणूकदारांना बाजारपेठेतील उतार-चढावांमुळे नुकसानीचा सामना करावा लागू शकतो.




● **तीन वर्षांसाठीच्या एसआयपीमध्ये नुकसान?**

ऑगस्ट १९९६ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील आकडेवारीनुसार, ३ वर्षांच्या एसआयपीने जवळपास १२ टक्के ऐतिहासिक कालावधीत उणे म्हणजेच निगेटिव्ह परतावा दिला आहे. याचा अर्थ असा की प्रत्येक वेळी ३ वर्षे गुंतवणूक करणाऱ्यांना फायदा झालाच असे नाही. अत्यंत वाईट परिस्थितीत ३ वर्षांच्या एसआयपीचा परतावा उणे २४.५९ टक्क्यांपर्यंत खाली घसरला होता, ज्यामुळे गुंतवणूकदारांना मोठ्या भांडवली नुकसानीला सामोरे जावे लागले. केवळ ३ वर्षेच नव्हे, तर ५ वर्षांची एसआयपी देखील पूर्णपणे सुरक्षित नव्हती; काही कालावधीत ५ वर्षांच्या एसआयपीचा परतावा उणे ९.४८ टक्क्यांपर्यंत खाली आला होता.

● **किमान आठ वर्षे गरजेची**

गुंतवणुकीचा कालावधी वाढल्यास परिस्थिती पूर्णपणे बदलते. या अहवालानुसार, ८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ चाललेल्या एसआयपीने कधीही उणे परतावा दिलेला नाही. म्हणजेच ८ वर्षे, १० वर्षे, १२ वर्षे आणि १५ वर्षे अशा सर्व रोलिंग एसआयपी कालावधीत गुंतवणूकदारांना नेहमीच सकारात्मक परतावा मिळाला आहे.

तसेच, कालावधीनुसार सर्वात खराब कामगिरीचे आकडेही सुधारत गेले. ३ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा उणे २४.५९ टक्के असताना, ८ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा ३.०३ टक्के आणि १५ वर्षांच्या एसआयपीचा किमान परतावा ७.३ टक्के नोंदवला गेला. यावरून असे दिसून येते की काळानुरूप बाजारातील अस्थिरतेचा परिणाम कमी होतो आणि नुकसानीची शक्यता संपते.

● **सर्वाधिक परतावा अल्प कालावधीत**

या अभ्यासातील एक रंजक बाब म्हणजे सर्वात जास्त परतावा दीर्घ मुदतीत नाही, तर कमी कालावधीत पाहायला मिळाला. ३ वर्षांच्या एसआयपीचा कमाल परतावा ५५.५६ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता, तर त्या तुलनेत १५ वर्षांच्या एसआयपीचा कमाल परतावा १८.१८ टक्के

■ निरीक्षण

राहिला. मात्र, अल्प कालावधीत परताव्यातील चढ-उतार आणि जोखीम खूप जास्त होती.

जसा गुंतवणुकीचा कालावधी वाढला, तसा परताव्याचा टप्पा अधिक स्थिर आणि अंदाज लावण्याजोगा बनला. विविध कालावधीत सरासरी एसआयपी परतावा साधारणपणे १४ ते १६ टक्क्यांच्या दरम्यान राहिला. दीर्घ कालावधीमुळे प्रचंड नफा किंवा प्रचंड तोटा या दोन्ही टोकाच्या शक्यता कमी झाल्या.

● **दोन अंकी परताव्याची शक्यता वाढली**

दीर्घकालीन एसआयपीमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळण्याची शक्यता अधिक मजबूत होत जाते. ३ वर्षांच्या एसआयपीमध्ये केवळ ६७ टक्के प्रकरणांमध्ये गुंतवणूकदारांना १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळाला. याउलट, १२ वर्षे आणि १५ वर्षांच्या एसआयपीमध्ये हे प्रमाण वाढून ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचले.

या अहवालाचा निष्कर्ष एसआयपी पूर्णपणे जोखीममुक्त आहे असा नाही. बाजारपेठेतील जोखीम एसआयपीमध्येही कायम राहते. तसेच कमी कालावधीत तिचा प्रभाव अधिक स्पष्ट दिसतो. परंतु, गुंतवणुकीचा कालावधी वाढल्यास यश मिळण्याची शक्यता वाढते. अल्प कालावधीत बाजाराची स्थिती परताव्यावर परिणाम करू शकते, मात्र दीर्घ कालावधीत नुकसानीची शक्यता वेगाने कमी होते. एसआयपीमधील यश हे बाजाराची अचूक वेळ साधण्यात नसून, बाजारात दीर्घकाळ टिकून राहण्यात आहे, हाच या अभ्यासाचा सर्वात मोठा धडा आहे.

◆◆◆

---

शेतीप्रधान असलेल्या आपल्या देशात शेतीपासून मिळणारे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त आहे, हा नियम सर्वसामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना चांगलाच ठाऊक आहे. प्राप्तिकर कायद्याच्या कलम १०(१) अंतर्गत शेती उत्पन्नाला करातून सूट देण्यात आली आहे. परंतु, अनेकदा या नियमाचा असा गैरसमज केला जातो की शेती उत्पन्न करमुक्त असल्यामुळे त्याची माहिती सरकारला किंवा प्राप्तिकर विभागाला देण्याची काहीच गरज नाही. हा विचार पूर्णपणे चुकीचा असून, आयटीआर म्हणजेच आयकर विवरणपत्र भरताना शेती उत्पन्नाची योग्य नोंद न केल्यास सर्वसामान्य करदाते किंवा शेतकरी मोठ्या कायदेशीर अडचणीत येऊ शकतात.




## रिटर्न भरताना शेतीउत्पन्न विसरू नका

सर्वप्रथम हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे की, जर तुमचे शेती व्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्न नसेल आणि शेतीचे उत्पन्न कितीही मोठे असले, तरी तुम्हाला आयटीआर भरण्याची कायदेशीर सक्ती नसते. परंतु, आजकाल अनेक शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्य नोकरी, व्यवसाय, बँक व्याज, शेअर्स किंवा इतर माध्यमांतूनही कमाई करत असतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीचे शेती व्यतिरिक्त इतर स्रोतांतून मिळणारे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा जास्त असते, तेव्हा त्याला आयटीआर भरणे बंधनकारक असते. अशा परिस्थितीत, जर त्या व्यक्तीचे शेतीचे वार्षिक उत्पन्न ५ हजार रुपयांपेक्षा जास्त असेल, तर आयटीआर भरताना त्याची स्वतंत्र नोंद करणे कायद्याने अनिवार्य आहे.

■ लक्षात ठेवा

आयकर विवरणपत्रामध्ये शेती उत्पन्नाची माहिती मागवण्यामागे प्राप्तिकर विभागाचा एक महत्त्वाचा हेतू असतो. कर रचनेमध्ये ‘अंशतः एकत्रीकरण’ म्हणजेच पार्शियल इंटिग्रेशन नावाचा एक नियम आहे. या नियमानुसार, प्रत्यक्ष शेती उत्पन्नावर कोणताही कर लावला जात नाही, मात्र करदात्याचा टॅक्स स्लॅब ठरवण्यासाठी या उत्पन्नाचा विचार केला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर, शेतीचे उत्पन्न आणि इतर करपात्र उत्पन्न एकत्र करून कराचा दर निश्चित केला जातो, ज्यामुळे करदात्याला काही प्रमाणात जास्त कर भरावा लागू शकतो. जर तुम्ही हे उत्पन्न लपवले, तर प्राप्तिकर विभागाच्या स्वयंचलित प्रणालीद्वारे विसंगती शोधून काढली जाते आणि तपासणीची नोटीस पाठवली जाते.

शेती उत्पन्न दाखवण्याचा दुसरा मोठा फायदा म्हणजे तुमच्या संपत्तीला मिळणारी कायदेशीर मान्यता. एखादी मोठी मालमत्ता, घर किंवा गाडी खरेदी करताना अथवा बँक कर्जासाठी अर्ज करताना आपल्याकडे पैशांचा अधिकृत स्रोत असणे गरजेचे असते. दरवर्षी आयटीआरमध्ये आपले शेतीचे उत्पन्न प्रामाणिकपणे दाखवले असेल, तर तो तुमच्या पांढऱ्या पैशाचा एक भक्कम कायदेशीर पुरावा बनतो. याउलट, आयटीआर न भरल्यास किंवा त्यात शेतीचे उत्पन्न न दाखवल्यास, प्राप्तिकर विभाग त्या पैशांना ‘अघोषित उत्पन्न’ मानू शकतो, ज्यावर प्रचंड मोठा दंड आणि कर आकारला जाऊ शकतो. अनेकदा लोक काळा पैसा पांढरा करण्यासाठी शेती उत्पन्नाचा खोटा आधार घेतात, त्यामुळे आता प्राप्तिकर विभाग शेती उत्पन्नाच्या दाव्यांची अत्यंत कडक तपासणी करतो.

### काही गोष्टींची विशेष काळजी घ्या

शेती उत्पन्न दाखवताना तुमच्याकडे सातबारा उतारा, आठ अ चा दाखला, पिकांची नोंदणी आणि पीक विक्रीच्या अधिकृत पावत्या किंवा बँक खात्यातील नोंदी असणे आवश्यक आहे. जर कधी प्राप्तिकर विभागाने चौकशी केली, तर हे दस्तऐवज सादर करावे लागतात. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात आयटीआर भरताना, आपल्या इतर उत्पन्नासोबतच शेती उत्पन्नाची अचूक नोंद शेड्युल ईआय म्हणजेच एक्झम्प्ट इन्कम अंतर्गत नक्की करा. हा प्रामाणिकपणा तुम्हाला भविष्यातील मानसिक त्रासापासून आणि प्राप्तिकर विभागाच्या नोटिसीपासून पूर्णपणे सुरक्षित

◆◆◆

---

## ‘रीट’मध्ये गुंतवणूक करताना...

म्युच्युअल फंड किंवा थेट शेअर्सप्रमाणेच आता भारतात रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट म्हणजेच ‘रीट’ चा आणखी एक पर्याय गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध झाला आहे. व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्रात कमी भांडवलात गुंतवणूक करण्याची आणि नियमित उत्पन्न मिळवण्याची संधी रीटच्या माध्यमातून मिळते. पण हा पर्याय तुमच्यासाठी योग्य आहे की नाही, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

ज्याप्रमाणे म्युच्युअल फंड सामान्य गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करून ते शेअर्समध्ये गुंतवतात, त्याचप्रमाणे ‘रीट’ गुंतवणूकदारांचे पैसे गोळा करून मोठे ऑफिस पार्क, आयटी पार्क, शॉपिंग मॉल्स किंवा कमर्शियल कॉम्प्लेक्स अशा व्यावसायिक मालमत्तांमध्ये गुंतवणूक करतात. या मालमत्तांमधून मिळणारे भाडे आणि नफा हा लाभांश किंवा व्याजाच्या स्वरूपात गुंतवणूकदारांना वाटला जातो.



भारतात रीट प्रामुख्याने शेअर बाजारात लिस्टेड असतात, त्यामुळे शेअर्सप्रमाणेच त्यांची खरेदी-विक्री करता येते.

नियमांनुसार, रीट कंपन्यांना आपल्या करपात्र उत्पन्नातील किमान ९० टक्के हिस्सा गुंतवणूकदारांना लाभांश किंवा व्याज म्हणून वाटणे कायदेशीररीत्या बंधनकारक असते. तरीही प्रत्येक गुंतवणूकदारासाठी ‘रिटस्’ हा योग्य पर्याय ठरेलच असे नाही. तुम्ही आर्थिक आयुष्याच्या कोणत्या टप्प्यावर आहात, यावर रीटमधील गुंतवणूक अवलंबून असावी:

जे गुंतवणूकदार तरुण आहेत आणि ज्यांचे उद्दिष्ट पुढील १० ते १५ वर्षांत मोठी संपत्ती निर्माण करण्याचे आहे, त्यांनी रीट ऐवजी ‘इक्विटी’ म्हणजेच शेअर्स किंवा म्युच्युअल फंडला प्राधान्य दिले पाहिजे. इक्विटीमध्ये दीर्घकाळात मिळणारी चक्रवाढ वाढ (कॅपिटल अप्रिसिएशन) ही रीटच्या तुलनेत जास्त असते.

**रिटायरमेंट किंवा रेग्युलर इन्कम फेज :** ज्या गुंतवणूकदारांना त्यांच्या भांडवलावर नियमित आणि सुरक्षित परतावा हवा आहे, त्यांच्यासाठी रीट उपयुक्त ठरू शकतो. मुदत ठेव (एफडी) किंवा डिबेंचर्सपेक्षा काही प्रमाणात चांगला आणि महागाईला मात देणारा परतावा रीटच्या माध्यमातून मिळू शकतो.

पण रीटमध्ये गुंतवणूक करताना केवळ मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार न करता त्यातील

■ अर्थसल्ला

जोखमींचाही अभ्यास करणे गरजेचे आहे:

रिअल इस्टेट क्षेत्र हे व्याजदरांशी जोडलेले असते. जेव्हा मध्यवर्ती बँकेकडून व्याजदर वाढवले जातात, तेव्हा रीटच्या कामगिरीवर आणि त्यांच्या युनिटच्या किमतींवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

आर्थिक मंदी किंवा वर्क फ्रॉम होमच्या ट्रेंडमुळे कार्यालयांची मागणी कमी झाली आणि इमारती रिकाम्या राहिल्या, तर रीटचे भाड्यापासून मिळणारे उत्पन्न कमी होते, ज्याचा थेट फटका गुंतवणूकदारांच्या लाभांशावर होतो.

रीट कडून मिळणाऱ्या लाभांश आणि व्याजावर कर रचनेनुसार टॅक्स लागू होतो. त्यामुळे आपल्या टॅक्स स्लॅबचा विचार करूनच यात गुंतवणूक करावी.

थोडक्यात बाजारात उपलब्ध असलेला नवीन रीट हा तुमच्या पोर्टफोलिओला विविधीकरण (डायव्हर्सिफिकेशन) देण्याचा एक चांगला मार्ग ठरू शकतो. परंतु, संपत्ती वाढवण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात असाल, तर इक्विटीवर अधिक भर देणे फायदेशीर ठरेल.

◆◆◆

# मनपाच्या सार्वजनिक मालमत्ता गहाण न ठेवता नगरसेवक-अधिकाऱ्यांच्या मालमत्ता गहाण घ्या

## १००० कोटींच्या कर्ज प्रकरणाबाबत ठाकरे शिवसेनेचे जागतिक बँकेला पत्र



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रस्तावित सुमारे १००० कोटी रुपयांच्या कर्जप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने थेट जागतिक बँकेकडे धाव घेतली आहे. महानगर प्रमुख किरण काळे यांनी जागतिक बँकेच्या भारतातील देश संचालकांना सविस्तर पत्र पाठवून कोणतेही कर्ज मंजूर करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीची, मागील पाणी योजनांची आणि लेखापरीक्षण अहवालांची सखोल पडताळणी करण्याची मागणी केली आहे. पत्राची प्रत मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री, नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना देखील पाठविण्यात आली आहे. हजार कोटींच्या कर्जासाठी वेळप्रसंगी सत्ताधारी अमरधामही गहाण ठेवायला मागेपुढे पाहणार नाहीत, असा घाणाघात काळेंनी केला आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, महानगरपालिकेने यापूर्वी फेज-१, फेज-२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांवर एकूण सुमारे ३०० कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र एवढा खर्च होऊनही शहरातील अनेक भागांमध्ये आजही एक दिवसाआड किंवा तीन-चार दिवसांनी पाणीपुरवठा होत असून अनेक नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे.

किरण काळे यांनी जागतिक बँकेच्या निदर्शनास आणून दिले आहे की, फेज-२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांना अद्याप पूर्णता प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत. त्यामुळे संबंधित कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत का, प्रकल्पांचे उद्दिष्ट साध्य झाले आहे का आणि सार्वजनिक निधीचा कार्यक्षम वापर झाला आहे का, याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

### मनपाची आर्थिक स्थिती चिंताजनक

पत्रात महानगरपालिकेची आर्थिक स्थितीही चिंताजनक असल्याचा दावा करण्यात आला आहे. नियमित खर्च, कर्मचारी वेतन, विकासकामांतील मनपाचा हिस्सा आणि ठेकेदारांची देणी याबाबत आर्थिक अडचणी असल्याचे नमूद करत अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात कर्ज उचलणे धोकादायक ठरू शकते, असे म्हटले आहे. तसेच मागील दहा वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, पाणी योजनांवरील खर्च, मालमत्तांची प्रत्यक्ष पडताळणी आणि आर्थिक क्षमता तपासल्याशिवाय कोणतेही कर्ज मंजूर करू नये, अशी विनंती ठाकरे शिवसेनेने जागतिक बँकेला केली आहे.

### नगरसेवक, अधिकाऱ्यांच्या प्रॉपर्टी तारण घ्या

महानगरपालिकेची मालमत्ता ही जनतेची मालमत्ता असल्याने कर्जासाठी ती तारण ठेवू नये. त्याऐवजी कर्ज मंजुरीच्या ठरावावर स्वाक्षरी करणारे नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी आणि या कर्जाला पाठिंबा देणारे लोकप्रतिनिधी यांनी वैयक्तिक जबाबदारी स्वीकारावी व आवश्यक असल्यास त्यांच्या वैयक्तिक मालमत्ता तारण घेण्यात याव्यात, अशी मागणी पत्रात करण्यात आली आहे.

निवडणुकांमध्ये उमेदवार मत खरेदीसाठी कोट्यावधी रुपये वाटतात. आलिशान गाड्यांमधून फिरतात. सत्तेच्या माध्यमातून पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावरती माया गोळा केली जाते. अनेकांकडे बेहिशोबी संपत्ती आहे. सर्वसामान्य करदात्या नगरकर, व्यापारी, उद्योजकांच्या गळ्याला फास लावण्या ऐवजी राजकीय नेत्यांच्या मालमत्ता यासाठी तारण घेतल्याशिवाय कर्ज देऊच नये, असे ठाकरे शिवसेनेचे मत असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

### ते अमरधाम ही गहाण ठेवतील

कर्ज तारणासह की तारणा शिवाय हे अद्याप निश्चित झालेले नाही. जर जागतिक बँकेने तारण मागितले तर मनपा काय काय देऊ शकते यावरती खल सुरू असल्याचा दावा किरण काळे यांनी केला आहे. काळेंनी दावा केला आहे की, त्याकरिता महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, जुने मनपा कार्यालय इमारत, प्रभाग कार्यालये, ओपन स्पेस, उद्याने, पिंपळगाव माळवी येथील सुमारे सातशे एकर भुखंड या सह मनपाच्या स्थावर मालमत्तेचे तपशील गोळा केले जात आहेत. अशा पद्धतीने जनतेच्या मालकीची मनपाची संपत्ती गहाण ठेवण्याचा राजकीय नेते, लोकप्रतिनिधींना कोणताही अधिकार नाही. राजकीय दबावातून प्रशासनाने ही ते पाप करू नये. आपल्या राजकीय कार्यकर्त्यांसाठी थेट स्मशानभूमीत ताबेमाती करून अनधिकृत गाळे बांधणारे सत्ताधारी वेळ पडली तर उद्या अमरधाम देखील गहाण ठेवायला मागे पुढे पाहणार नाहीत. तसे झाले तर नगरकरांना मरणानंतर सुखा सुखी मोक्ष सुद्धा मिळू शकणार नाही, असा टोला किरण काळे यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला आहे.

# जेसीबीने दुचाकीस्वाराला चिरडणाऱ्या आरोपीला पोलिसांनी केले अटक



नगर – मुरूम चोरणाऱ्यांचा दुचाकीवर पाठलाग करणाऱ्या दुचाकीस्वारांच्या अंगावर जेसीबी घालून एकाचा बळी घेणारा आरोपी राम उर्फ गणेश मधुकर म्हस्के (वय ३५, रा. जेऊर बायजाबाई) याला एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने जेसीबीसह अटक केली आहे.

ही घटना २९ मे रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रोडवर जरे वस्तीजवळ घडली होती. तक्रारदार विजय दत्तू कजबे आणि त्यांचा मित्र प्रदीप चिंचने हे दोघे आपल्या मोटारसायकलवरून जात असताना त्यांना धनगरवाडी शिवारात हनुमान मंदिर शेजारील एका प्लॉटमध्ये काही लोक जेसीबीच्या सहाय्याने मुरूम चोरी करताना दिसले. ते तेथे जाताच आरोपी राम म्हस्के आणि त्याच्यासोबत असलेल्या जेसीबी चालकाने घटनास्थळावरून पळ काढला.

विजय कजबे आणि प्रदीप चिंचने यांनी आपल्या मोटारसायकलवरून (क्र. एमएच १६ बी २१२६) त्यांचा पाठलाग केला व जेसीबीला दुचाकी आडवी लावली. त्यावेळी आरोपीने जेसीबी भरधाव वेगात चालवून त्यांच्या दुचाकीला धडक दिली. आरोपीला कृत्य जीवघेणे ठरू शकते याची जाणीव असूनही त्याने दुचाकीस्वारांना काही अंतर फरपटत नेले, ज्यामध्ये प्रदीप चिंचने यांचा मृत्यू झाला आणि विजय कजबे गंभीर जखमी झाले.

या घटनेनंतर एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये बीएनएस कलम १०५ आणि ३(५) नुसार आरोपी विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यावर स.पो.नि. माणिक चौधरी यांनी आरोपींचा शोध सुरु केला. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पोलिसांनी आरोपी राम उर्फ गणेश मधुकर म्हस्के (वय ३५, रा. जेऊर बायजाबाई) याला जेसीबीसह अटक केली आहे. सध्या पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

ही कारवाई स.पो.नि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक मनोज मोंढे, पोलिस अंमलदार राकेश खेडकर, राजू सुद्रिक, आजिनाथ पालवे, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, जयसिंग शिंदे, तांदळे यांच्या पथकाने केली आहे.

# फोटो व्हायरल करण्याची धमकी देत मागीतली खंडणी, गुन्हा दाखल

नगर – प्रेमसंबंधातील कथित फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत २० हजार रूपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी निंबळक (ता. नगर) येथील २७ वर्षीय तरूणाने ३० मे रोजी रात्री फिर्याद दिली आहे.

विकास शिंदे ऊर्फ शनीबाबा व बल्या (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा प्रकार २९ मे रोजी दुपारी दोनच्या सुमारास एमआयडीसीतील एका कंपनीमध्ये घडला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास एमआयडीसीतील एका कंपनीत असलेल्या महिलेच्या मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने फोन केला. यावर फिर्यादीने त्या नंबरवर २:१४ वाजताच्या सुमारास फोन केला असता संबंधित व्यक्तीने स्वतःचे नाव बल्या असे सांगितले. त्याने फिर्यादी व महिलेच्या कथित प्रेमसंबंध दर्शविणारे फोटो आपल्या मोबाईलमध्ये असल्याचे सांगून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली.

दरम्यान, हे फोटो व्हायरल करायचे नसतील तर २० हजार रूपये द्यावे लागतील, अन्यथा फोटो व्हायरल करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच दुसर्या दिवशी म्हणजे ३० मे रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास विकास शिंदे उर्फ शनीबाबा आणि बल्या यांनी पुन्हा फोन करून पोलिसांकडे तक्रार केल्यास खून करून टाकू, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून अधिक तपास पोलीस अंमलदार चौधरी करीत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी फेसबुकवर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या डॉक्टराविरुद्ध गुन्हा दाखल!

पारनेर – सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि समाजात द्वेष निर्माण करणारा मजकूर प्रसिद्ध केल्याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात एका डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वंचित बहुजन आघाडीचे पारनेर युवक तालुकाध्यक्ष संकेत विनायक पटेकर यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पारनेर तालुकाध्यक्ष बाळासाहेब पातारे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली ही कायदेशीर लढाई लढली जात असून, त्यांच्याच पुढाकाराने पोलिसांनी तातडीने पावले उचलली आहेत. याप्रकरणी पारनेर पोलिसांनी आरोपी डॉ. मंगेश बेकारसे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २९९ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल अनिल देवकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. हा गुन्हा नोंदवून घेण्यासाठी विविध संघटनांचे पदाधिकारी राजेंद्र करंदीकर, आरपीआय पारनेर तालुका युवक अध्यक्ष प्रदीप नगरे, तसेच गौतम पटेकर, निलेश पटेकर, संभाजी पटेकर, विशाल पटेकर, भागा सोनवणे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला.

### डॉक्टरला खंडणी मागणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी फेसबुक वर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या डॉ. मंगेश बेकारसे यांना १० लाखांची खंडणी मागणाऱ्या सुमेध गायकवाड व विजय मकासरे (दोघे रा. निघोज, ता. पारनेर) या दोघांवर भा.न्या.सं. कलम ११९(१), ३०८(२), (३), १२६(२), १३३, ३५१(२)(४), ३५२, ३५६(२), १८९(२), १९१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी या प्रकरणी ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत प्रकरण मिटवण्यासाठी १० लाखांची खंडणी मागितली आणि पैसे देण्यास नकार दिल्याने २९ मे रोजी सकाळी ११ वाजता आरोपींनी ३५ ते ४० अनोळखी महिला आणि पुरुषांना सोबत घेऊन फिर्यादीच्या 'समर्थ हॉस्पिटल', भाळवणी येथे गोंधळ घातला. या जमावाने फिर्यादीच्या पँटच्या खिशातून १५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले, त्यांच्या गळ्यात चपलांचा हार घातला आणि अंगावर शाई फेकून त्यांची बदनामी केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.



गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांनी कामबंद ठेऊन विरोध दर्शविला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने स्थलांतराला विरोध दर्शविण्यासाठी १ जून जलसिंचन भवनासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जलसंपदा विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

# गोदावरी-कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराला कर्मचाऱ्यांचा तीव्र विरोध; नगर जलसिंचन भवनासमोर कामबंद करुन निदर्शने; आदेश रद्द करा

## कार्यालये हलविण्याचा निर्णय शेतकरी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींसाठी गैरसोयीचा; मुख्यमंत्री यांना निवेदन

नगर – गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांनी कामबंद ठेऊन विरोध दर्शविला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने स्थलांतराला विरोध दर्शविण्यासाठी १ जून जलसिंचन भवनासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जलसंपदा विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच कार्यालयांचे स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले.

या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय तोडमल, देविदास पाडेकर, वैशाली बोडखे, मृदुला भोर, उषा देवकाते, गंगासागर उगले, अनिता निकाळजे, अश्विनी कोंडा, शुभांगी लवांडे, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा औटी, स्नेहल राऊत, राधा चौधरी, संजीवनी गायकवाड, अश्विनी भगत, दीपा सातपुते, प्रियंका म्हस्के, शिल्पा ताजणे, पल्लवी तोडमल, अश्विनी देवराय, संगीता कार्ले, दीपक गीते, रवींद्र कोडम, रोहित निमसे, प्रसाद कराळे, प्रशांत आठरे, मनोज देशमुख, राजेश जाधव, संतोष गांगर्डे, किशोर गांगर्डे, कृष्णा आंधळे, आदिनाथ कराळे, रवींद्र तवळे, दत्ता सावरे, संतोष कासार, पोपट जायभाय, जालिंदर सुपेकर आदींसह जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

जलसंपदा विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या सर्व सिंचन महामंडळांच्या कामकाजावर शासन स्तरावरून नियंत्रण ठेवले जाते. महामंडळ स्तरावरील महत्त्वाचे निर्णय शासनाच्या मान्यतेनंतरच निर्गमित होत असतात. मात्र शासन व जलसंपदा विभागाची पूर्वमान्यता न घेता संबंधित महामंडळांकडून विविध कार्यालयांच्या स्थलांतराचे आदेश काढण्यात आल्याची बाब चिंताजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. संघटनेच्या मते, प्रस्तावित स्थलांतरामुळे प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे. अनेक वर्षांपासून कार्यरत असलेली कार्यालये अचानक अन्यत्र हलविणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेने विशेषतः अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाच्या स्थलांतरास विरोध दर्शविला आहे. अहिल्यानगर पाटबंधारे विभाग सन १९३० पासून अहिल्यानगर मुख्यालयात कार्यरत असून त्याचे लोणी (ता. राहाता) येथे स्थलांतर प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच सन १९७२ पासून कार्यरत असलेल्या मुळा पाटबंधारे विभागाचे मुख्यालय राहुरी येथे हलविण्याचा प्रस्ताव आहे.

या दोन्ही विभागीय कार्यालयांचे कामकाज जिल्हास्तरावरील प्रशासकीय नियंत्रणाशी संबंधित आहे. विभागांच्या कार्यक्षेत्रात उपविभागीय व शाखास्तरीय कार्यालये कार्यरत असल्यामुळे विविध तालुक्यांतील लाभधारक, शेतकरी व कर्मचारी यांच्यासाठी अहिल्यानगर मुख्यालय अधिक सोयीचे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

याशिवाय मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय कोल्हापूर येथे, मुख्य अभियंता (विप्र) जलसंपदा विभाग, पुणे यांचे कार्यालय सोलापूर येथे आणि मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, संभाजीनगर यांचे कार्यालय नांदेड येथे स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या मुख्यालयातच मुख्य अभियंता कार्यालय कार्यरत असणे प्रशासकीय दृष्ट्या अधिक उपयुक्त असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. आजपर्यंत ही कार्यालये जिल्हास्तरावर नव्हती. त्यामुळे संबंधित प्रदेशातील सर्व जिल्ह्यांचा विचार करता प्रादेशिक मुख्यालयातच ही कार्यालये राहणे अधिक सोयीस्कर व परिणामकारक ठरेल, असा दावा करण्यात आला.

कार्यालयांचे स्थलांतर झाल्यास त्या ठिकाणी रिक्त होणाऱ्या जागांवर खाजगी संस्थांकडून अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीतीही संघटनेने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासकीय, सामाजिक व सार्वजनिक हिताचा विचार करून प्रस्तावित स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे आणि संबंधित विभागांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. आंदोलनकर्त्यांनी शासनाने हा निर्णय पुनर्विचार करून कार्यालये मूळ ठिकाणीच कायम ठेवावीत, अशी एकमुखी मागणी केली.

# पेट्रोल-डिझेल, गॅस दरवाढीविरोधात निदर्शने, इंधन दरवाढीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी




नगर – पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सतत वाढत असलेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान ढासळत असून महागाईच्या झळा प्रत्येक घटकाला बसत आहेत. या वाढत्या महागाईच्या निषेधार्थ तसेच केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी इंधन दरवाढ तातडीने कमी करावी आणि आवश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण आणावे, अशी मागणी करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सहसेक्रेटरी कॉ. ॲड. सुधीर टोकेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आयटकचे कॉ. सतीश पवार, कॉ. सुभाष ठुबे, सुभाष शिंदे, बाळासाहेब बहिरट, कन्हैया बुंदेले, प्रा. सुभाष कडलग, ज्ञानदेव गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

देशभरात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. इंधन हे जीवनावश्यक गरजांशी निगडित असल्याने त्याच्या दरवाढीचा परिणाम वाहतूक, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण आणि घरगुती खर्च अशा सर्व क्षेत्रांवर होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

भाकपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सरकार नागरिकांना काटकसरीचा सल्ला देत असले तरी प्रत्यक्षात इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य माणसाचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये चढ-उतार होत असले तरी त्याचा संपूर्ण आर्थिक भार जनतेवर टाकणे योग्य नाही. सरकारने कररचनेत सवलत देऊन नागरिकांना दिलासा देण्याची गरज आहे. निवेदनात म्हटले आहे की, पेट्रोलचे दर अनेक ठिकाणी १११ ते ११३ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचले आहेत. डिझेलच्या दरातही लक्षणीय वाढ झाली असून सीएनजीच्या किमतीदेखील वाढल्या आहेत. परिणामी वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, अन्नधान्य तसेच विविध सेवांच्या किमती वाढल्या आहेत. इंधन दरवाढीचा परिणाम हॉटेल व्यवसाय, लघुउद्योग, व्यापारी वर्ग तसेच कामगार आणि विद्यार्थी वर्गावरही होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. पूर्वी ९० रुपयांत मिळणारे जेवण आता १५० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा दावा करण्यात आला. मेस, उपाहारगृहे आणि इतर सेवाक्षेत्रातील खर्च वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडत आहे.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले. जनतेला दिलासा मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.




### महापुरुषांच्या नामफलकाची अवहेलना

शहरातील स्टेशन रोड परिसरातील टिळक रस्त्यावरील संकेत हॉटेल जवळच असलेल्या रस्त्याला लोकमान्य टिळक रस्ता असे नाव दिले होते. मात्र या नावाचा फलक परिसरातील रस्त्याचे काम पूर्ण होऊनही भिंतीलागत धुळखात पडला आहे.

